सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com






15 जानेवारी 2026 | सकाळी 7:30 ते संध्याकाळी 5:30

**भाजपाला मतदान करून प्रचंड बहुमतांनी विजयी करा**

प्रकाशक : भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र, सीडीओ बॅरेक्स 1, एलआयसी कार्यालयासमोर, नरिमन पॉइंट, मुंबई - 400021

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती




**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आज दि. १२ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारक्षम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळेच छत्रपती शिवाजी महाराज घडले. तसेच स्वामी विवेकानंद यांनी तरुणांना दिलेला आत्मविश्वास, ध्येयवादी दृष्टिकोन व कर्तृत्वावरचा विश्वास आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतातून थोर विभूतींच्या विचारांचे महत्त्व विशद केले.

### स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी



**बिडकीन :** जानेवारी पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद येथे यांची जयंती युवक दिवस म्हणून साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक रायभान रक्ते यांच्या हस्ते महान विभूतीच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले, व कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. विद्यार्थांनी या दोन महान विभूती यांच्या जीवनावर वक्तृत्व सादर केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापकांनी त्यांच्या महान कार्याबद्दल माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमलाकर काळे यांनी केले तर आभार श्रीधर जऱ्हाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामनाथ धनवे, सुनील पवार, अप्पासाहेब किसवे, विश्रांती सलगरे, पल्लवी नरवडे, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले. राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली

### अँटी-मायक्रोबियल सीपीव्हीसी पाईप्स लाँच

**पुणे :** सिंटेक्स बाय वेल्स्पन, या भारताच्या आघाडीच्या तसेच मोठ्याप्रमाणावर विश्र्वासू दर्जेदार जल संग्रहण समाधानांच्या निर्मात्यांनी, आज जगातील सर्वप्रथम एंटी-मायक्रोबिअल सीपीव्ही-सी पाइप्सच्या परिचयाची महाराष्ट्राच्या पुणे शहरात घोषणा केली. या घोषणेमुळे त्यांनी जल संग्रहणातील आपल्या ५० वर्षांच्या परंपरेला मजबूती देत जल वितरण क्षेत्रात धोरणात्मक विस्ताराला चिन्हांकीत केले आहे. सिंटेक्सने पाइपची संपूर्ण रेज आणली आहे- सीपीव्हीसी, यूपीव्हीसी, एसडब्ल्यूआर (सॉइल, वेस्ट आणि रेन वॉटर), रीक्लेम, ॲग्री, अंडरग्राउंड ड्रेनेज सरफेस ड्रेनेज पाइप आणि फिटिंग्जमध्ये पुन्हा आपला हक्क सांगितला आहे. या पाइपांची रचना गरम आणि थंड पाण्याला, ग्रेवॉटर आणि ब्लॅकवॉटरला सक्षमपणे व्यवस्थापित करण्यासाठी केलेली असून प्लंबिंगच्या सर्व गरजा पूर्ण केल्या गेल्या आहेत. विशेषकरुन एसडब्ल्यूआरआणि अंडरग्राउंड ड्रेनेज पाइप उंदीर प्रतिबंधक गुणविशेषांसह येतात, ज्यामुळे सुधारीत टिकाऊपणा आणि सुरक्षेची हमी मिळते.

### प्रथमच येत आहे पॉ पेट्रोल

**पुणे :** जगभरात प्रसिद्ध आणि लहान मुलांमध्ये लोकप्रिय असलेला प्री-स्कूल शो (पी ए डब्ल्यू) पॉ पेट्रोल आता प्रथमच पुण्यात येत आहे. हा खास कार्यक्रम फिनिक्स मार्केटसिटी पुणे येथील लिबर्टी स्क्वेअर येथे ९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी लिबर्टी स्क्वेअर हे ठिकाण ॲडव्हेंचर बे थीमवर सजवले जाणार आहे. मुले आणि कुटुंब येथे मजेदार आणि इंटरॅक्टिव्ह अनुभवाचा आनंद घेऊ शकतील. हा उपक्रम भारतात जिओस्टारकडून सादर केला जात आहे. हा खास कार्यक्रम लहान मुलांना त्यांच्या आवडत्या पप्पी हिरोंच्या जगात घेऊन जाणार असून, विविध ॲक्टिव्हिटी झोनमध्ये आयोजित केलेल्या मजेदार आणि थीमवर आधारित मिशन्समध्ये सहभागी होण्याची संधी देणार आहे.

### लासूर स्टेशन येथे शासकीय मका खरेदी केंद्र सुरू



**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन, तालुका गंगापूर येथे शासकीय मका खरेदी केंद्राचे उद्घाटन खरेदी-विक्री संघाचे उपसभापती आप्पासाहेब पाचपुते यांच्या हस्ते करण्यात आले. शेतकऱ्यांकडून दीर्घकाळापासून मका खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी होत होती. त्या मागणीची दखल घेऊन शासनाच्या वतीने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रावर शासनाने निश्चित केलेल्या २४०० प्रती क्विंटल या दराने मका खरेदी केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन पाचपुते यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खरेदी-विक्री संघाचे संचालक ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमास बाजार समितीचे संचालक सुनील पाखरे, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष किशोर पवार, मोहनराव खंडागळे, रिचर्ड बत्तीशे, दिगंबर गोटे, प्रभू बागुल, कडूभाऊ शेलार, सुनील दुसिंग, बाळासाहेब थोरात, सिद्धार्थ गायकवाड, तहसीलचे शेख साहेब, खरेदी-विक्री संघाचे कर्मचारी बाळासाहेब सोनवणे, अनिल गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर, ऑरिक इकोसिस्टम हे परिवर्तनाचे प्रमुख केंद्र म्हणून पुढे येत आहे : ऋषी कुमार बागला

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** भारताला जागतिक उत्पादन क्षेत्रातील स्पर्धात्मक पॉवरहाऊस म्हणून उभे करण्यामध्ये छत्रपती संभाजीनगर आणि ऑरिक इकोसिस्टमची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे प्रतिपादन सीआयआय पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष ऋषी कुमार बागला यांनी केले. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) तर्फे येथे आयोजित सीआयआय लीडरशिप कॉन्फरन्स – महाराष्ट्र मध्ये ते बोलत होते.

क्षेत्रीय आणि प्रादेशिक उत्कृष्टतेद्वारे भारताची स्पर्धात्मकता वाढवणे या धोरणात्मक विषयावर आधारित या परिषदेत राज्य व देशातील आघाडीचे उद्योगनेते, धोरणकर्ते आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी प्रमुख भागधारक उपस्थित होते. परिषदेमध्ये सीआयआय वेस्टर्न रीजनचे उपाध्यक्ष वीर अडवाणी, मिलन के. नाग, के. के. नाग, अर्जुन चौगुले, नरेंद्र कुलकर्णी तसेच सीआयआयच्या प्रादेशिक संचालक सुश्री वैशाली श्रीवास्तव यांचा समावेश होता.




बागला यांनी आपल्या भाषणात इलेक्ट्रिक मोबिलिटीला भारताच्या आर्थिक ट्रान्सफॉर्मेशनचा स्ट्रॅटेजिक ग्रोथ ड्रायव्हर असल्याचे स्पष्ट केले. या प्रदेशातील जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा, मजबूत ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग बेस आणि एकात्मिक एमएसएमई इकोसिस्टममुळे मराठवाडा ईव्ही उत्पादन व जागतिक व्हॅल्यू चेनमध्ये महत्त्वपूर्ण हब म्हणून विकसित होण्याची क्षमता ठेवतो, असे त्यांनी नमूद केले.

समावेशक आणि क्लस्टर-आधारित औद्योगिक विकास, कनेक्टिव्हिटी इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रभावी उपयोग, तसेच 'चायना प्लस वन' धोरणांतर्गत जागतिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सीआयआय धोरण वकिली, कौशल्य विकास, शाश्वतता आणि तंत्रज्ञान भागीदारीच्या माध्यमातून सक्रिय भूमिका बजावत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## 'शीतल मेट्रो ब्रेन अबॅकस'चे राज्यस्तरीय परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा,**

**लासूर स्टेशन, दि.१२ :** शीतल मेट्रो ब्रेन अबॅकस अकॅडमी, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत संस्थेच्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. या परीक्षेत राज्यभरातून सुमारे १७५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या परीक्षेत ओम दत्तात्रय नरोडे याने-५ कॅटेगरीतून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला, तर वैष्णवी संतोष तुपे हिने न८ कॅटेगरीतून राज्यात तिसरा क्रमांक मिळवून संस्थेचा नावलौकिक वाढविला. तसेच राम अनिश गहिरे आणि श्लोक अशोक सोनवणे यांनी ॲक्लर अवॉर्ड मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकवर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत असून, या यशामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक व बौद्धिक विकास होत असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

या पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध सिने अभिनेते निखिल बने यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेट्रो ब्रेन अबॅकस प्रा. लि. चे संचालक संतोष लोहारे सर होते. यावेळी कंपनीच्या संचालिका सीमा लोहारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## शिवसेनेच्या (उबाठा) काळात अग्निशमन दलातील कथित घोटाळ्यांमुळे मुंबईकरांचा जीव धोक्यात

**मुंबई :** उत्तर गोव्यातील नाईट क्लबला लागलेल्या भीषण आगीच्या पार्श्वभूमीवर, मुंबईतील अग्निसुरक्षेचे नियम आणि अग्निशमन दलाची कार्यक्षमता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. २०१७ मधील कमला मिल्स कंपाऊंडमधील दुर्दैवी आगीची आठवण करून देत, मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाशी संबंधित गेल्या काही वर्षांत उघडकीस आलेल्या गंभीर घोटाळ्यांमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सत्ताकाळात मुंबईकरांच्या जीवाशी खेळ झाल्याचे बोलले जात आहे.

या कथित भ्रष्टाचारामुळे हजारो मुंबईकरांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. एनओसी वाटप घोटाळ्यामुळे अपुऱ्या अग्निसुरक्षा व्यवस्थेसह उंच इमारतींना मंजुरी मिळाली, तर २०२३ मध्ये नोकरभरतीत ६१ उमेदवारांना बनावट नियुक्ती पत्रे देऊन सुमारे २.३ कोटी उकळल्याचा आरोप आहे. याव्यतिरिक्त, बांधकाम विकासकांना सूट देण्यासाठी ५,००० कोटींचा अग्निशमन सेवा शुल्क घोटाळा, १२ कोटींचा गणवेश खरेदी घोटाळा आणि एका विशिष्ट कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठी टर्नटेबल शिडी खरेदी प्रक्रियेत सुमारे ४० कोटींचा अतिरिक्त खर्च केल्याचा गंभीर आरोप भाजपने केला आहे. कमला मिल्स आग प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने बीएमसीने आपले घर व्यवस्थित करण्याची वेळ आली आहे असे ताशेरे ओढले होते. हे सर्व घोटाळे थेट नागरिकांच्या सुरक्षेशी जोडलेले असल्याने, येऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईकरांना भ्रष्टाचाराची ही व्यवस्था सुधारण्यासाठी योग्य पक्षाला निवडून देण्याची संधी उपलब्ध आहे.

## श्री गुरु गणेश तीर्थ दर्शन पदयात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** प.पू. कर्नाटक गजकेशरी गणेशलालजी मा.सा. यांच्या ६४ व्या पुण्यतिथी निमीत्त परमेष्ठी ग्रुप तर्फे एकोणाविसव्यांदा छ. संभाजीनगर ते जालना १६ जनवरी २०२६ ते १८ जनवरी २०२६ पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा प.पु. स्व. ग्यानगंगोत्री प्रभाकरवरजी म.सा. यांच्या सुशिष्या महाराष्ट्र प्रवर्तीनी स्व. प्रकाशकवरजी म.सा. यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने ही पदयात्रा सलग मागील अठारह वर्षापासून निघत आहे. व हयावर्षी १६ जनवरी २०२६रोजी ठिक सकाळी ५.३० वाजता महावीर भवन कुंभारवाडा, औरंगपुरा चौक येथुन निघणार आहे.

प.पू. गणेशलालजी मा.सा. यांचे जालना येथील शिवाजी चौक येथे समाधी स्थळ आहे. अमावस्येच्या दिवशी गुरुमहाराज यांचे समाधी मरण झालेले आहे व त्याठिकाणी त्यांना समाधी देण्यात आली. म्हणून येथील समाधी दर्शनाला अमावस्येच्या दिवशी जैन धर्मात फार महत्व आहे. श्रुतमुनी मा. सा., सौरवमुनी मा.सा., गौरवमुनी मा.सा., प.पू. अक्षरमुनी मा.सा., प.पू. प्रतिभाकवरजी मा.सा., प.पू. किरण सुधाजी मा.सा. व अनेक साधू संतांच्या उपस्थितीत १८ जनवरी २०२६ रोजी गणेश नगर, जालना येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. या यात्रेत सर्व यात्रेकरु व भाविकांची आहरपाणी व मुक्कामाची संपूर्ण व्यवस्था परमेष्ठी परिवार तर्फे करण्यात आलेली आहे व सोबत ॲम्ब्युलन्स व डॉक्टरांसहीत ॲम्ब्युलन्सही सोबत राहणार आहेत.

पदयात्रा १६ जनवरी २०२६ रोजी ठिक सकाळी ५.३० वाजता महावीर भवन, आचार्य आनंद ऋषीजी मार्ग, कुंभारवाडा येथून शोभायात्राद्वारे निघाणार आहे. ही पदयात्रा औरंगपुरा रोड, गुलमंडी, राजाबाजार, मोंढा नाका, जालना रोड मार्गे चिकलठाणा येथे सकाळी ८.०० वाजता पोहचेल. दुपारी १.०० च्या दरम्यान ही पदयात्रा करमाडनंतर शेकटा कडे प्रस्थान करेल. शेकटा येथे पदयात्री मधील भाविकांची जेवणाची आहे.

# स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त १०५ जणांनी केले रक्तदान

### राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कर्वेनगर मधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शिबिराचे आयोजन

**पुणे :** स्वामी विवेकानंद यांच्या १६३ व्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय युवा दिनानिमित्त रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी कर्वेनगर मधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व शाखांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर कर्वेनगर येथील ताथवडे उद्यानासमोरील मधुसंचय सोसायटीच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

कर्वेनगरमधील मधुसंचय सोसायटीचे विश्वस्त महेश पानसे, संगीता वाघ यांचे हस्ते स्वामी विवेकानंद आणि भारतमाता प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर सहकार्यवाह मंगेश घाटपांडे,कर्वेनगर संघचालक उदयन पाठक, रक्तदान शिबिर प्रकल्प प्रमुख महेश कुलकर्णी यांची मुख्य उपस्थिती होती.सुरवातीस जनकल्याण रक्तपेढी व उपस्थितांच्या वतीने रक्तदान प्रार्थना सामुहिकरीत्या म्हणण्यात आली.



स्वामी विवेकानंद हे एक महान विचारवंत आणि आध्यात्मिक गुरु होते. त्यांनी भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक उत्थानासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.त्यांचे विचार आजही युवकांना प्रेरणा देतातअसे प्रतिपादन महेश पानसे यांनी रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी केले.

ह्या रक्तदान शिबिरामध्ये १२९ जणांनी नोंदणी केली,त्यातील १०५ जणांनी रक्तदान केले,त्यामध्ये ९४ पुरुष आणि ११ महिलांचा समावेश होता.चोवीस जणांना वैद्यकीय कारणांमुळे रक्तदान करता आले नाही,तरी त्यांची रक्तदान करण्याची इच्छा कौतुकास्पद होती.रक्तदात्यांमध्ये ४० टक्के स्वयंसेवक आणि ६० टक्के नागरिक उपस्थित होते.

कर्वेनगर नगरातील सर्व प्रभात शाखांनी यापूर्वी झालेल्या रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना संपर्क केला,सोसायट्यांमध्ये संपर्क करण्यात आला.तसेच आय.टी. मिलन, व्यवसायी शाखांनी गृहरचनांमध्ये जाऊन प्रत्यक्ष संपर्क, पत्रके वाटप, पोस्टर्स, समाजमाध्यमे यावर रक्तदानाची जनजागृती करून नवीन रक्तदाते जोडले.

रक्तदान शिबिराच्या आयोजनाचे हे तिसरे वर्ष आहे. शिबिर यशस्वितेसाठी जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी संतोष अंगोळकर,डॉ पल्लवी कदम,अमृता मेटे, गणेश शिंदे, अमित चव्हाण, सुनीता थोरवे, सुनंदा पवार, किर्ती कुंभार, ओंकार पाडेकर, निकिता जाधव, ईशा कुंजीर यांचे सहकार्य लाभले.

## साखरपुड्यातच उरकला लग्न सोहळा

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१२ :** आदर्श शाळेतील आदर्श शिक्षकाचा आदर्श विवाह जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील आदर्श शिक्षक तसेच तिडका येथील माजी पोलीस पाटील रामचंद्र महाकाळ दि.११ रविवार रोजी पेडगाव ता.सिल्लोड येथील साईनाथ अंभोरे याची कन्या शुभांगी यांच्याशी साखपुडा पार पडल्यानंतर समाजातील ज्येष्ठ मंडळीनी लग्नाचा प्रस्ताव वर पिता डिगाबर महाकाळ व वर



रामचंद्र महाकाळ व वधू पिता साईनाथ अंभोरे यांच्याकडे माडला असता या प्रस्तावाला वर व वधू यांनी मान्यता दिली व लगेचच संध्याकाळी लग्न लावण्यात आले.

साध्या पध्दतीने लग्न लावल्याबदद्ल तिडका येथील महाकाळ परीवार व पेडगाव येथिल अंभोरे परीवाराचे कौतुक हैत असून समाजातील सर्वानी या विवाहाचा आदर्श घेण्यासारखा आहे.

या आदर्श विवाहासाठी विशेष सहकार्य केंद्रीय शाळा सोयगावचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, स्वामी दयानंद माध्यमिक विद्यालय तिडका येथील मुख्याध्यापक सुनील सरदार राजपुत, किसनदादा खंबाट, साईनाथ अंभोरे, भागवत अंभोरे, दत्तू गवांडे वाकी, दिगंबर महाकाळ, गवळी, दिगंबर जाधव, दिलीप क्षीरसागर, पुंडलिक कदम याच्या सहकार्याने आदर्श साखरपुड्यात लग्न संपन्न झाला.

## जायंट्स पायोनियर्स ग्रुप नूतन अध्यक्षपदी अजय अग्रवाल; सचिवपदी अनुप अग्रवाल

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** जायंट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर्स संस्थेच्या वर्ष २०२६ च्या नुतन कार्यकारीणीचा पदभार सोहळा नुकताच पार पडला.




यात अध्यक्षपदी अजय अग्रवाल, सचिवपदी अनुप अग्रवाल, उपाध्यक्षपदी स्वप्ना वलसेकर, क्रांती डागा, कोषाध्यक्षपदी हरीष अग्रवाल, संचालक मंडळात अभय शहा, निरज कलंत्री, आशीष सुराणा, विशाल कांकरिया, मुकुल गोयल, स्वस्तीक मिनीयार, साशीमा जैस्वाल, श्वेता सोमाणी, शीतल पांडे, पल्लवी नारखेडे, रुपाली सफला, रुचिका जैस्वाल तर अमित मालाणी, नितीन अग्रवाल, नितीन भालानी, रितेश अग्रवाल यांची मार्गदर्शक म्हणून निवड झाल्याचे माजी अध्यक्षा शीतल अग्रवाल योनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सुनिल गोयल, सुभाष देविदान, विनोद शेवतेकर, सूर्यमाला मालाणी, जुगलकिशोर हरकुर, संन्मती जैन इत्यादी मान्यवर उपस्थीत होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश न्यायालय, क.स्तर न्यायालय, गंगापुर. ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३/२०२६

अर्जदार :- १) लक्ष्मीबाई सोनाजी तागड, रा. अरब गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद, २) बाबुराव सोनाजी तागड, रा. आंबेडकर उदयानजवळ, अरब गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद, ३) रामनाथ सोनाजी तागड, रा. अहिल्यादेवी होळकर मंदिराजवळ, अरब गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) दादासाहेब सोनाजी तागड, रा. अहिल्यादेवी होळकर मंदिराजवळ, अरब गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) नानासाहेब सोनाजी तागड, रा. अरब गल्ली, कुंभार गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि.औरंगाबाद ६) लताबाई रायभान मतकर, रा. हनुमंतगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद ७) सुनिता मच्छिंद्र घोडके, रा. हनुमंतगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद ८) लक्ष्मी कारभारी सोलंटक रा. वळदगाव ता. जि. औरंगाबाद ९) द्वारका दादासाहेब मंडलिक रा.झोडेगाव ता.गंगापुर जि.औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार. :- निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी, सोनाजी दशरथ तागड यांचा दिनांक २४/१२/२००८ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असून वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी ड.बी.जे.लांडे गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी अर्जदार व प्रतिपक्षी यांना या न्यायालयातर्फे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत नोंदवावा. मुदतीच्या आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझे सहीनिशी व या न्यायालयाचे शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

दि. ०७/१/२०२६

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर,**
**ता. गंगापूर जि. औरंगाबाद**

CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक २७७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

### राष्ट्रमाता जिजाऊंचा ४२८ वा जयंती महोत्सव

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता जिजाऊंचा ४२८ वा जयंती सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. जिजाऊंचे जन्मगाव असलेल्या राजे लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यात जिजाऊंच्या जन्मस्थळी जिजाऊ भक्तांनी मोठी गर्दी केली आहे. सकाळी लखोजीराव जाधव यांच्या वंशजाकडून विधिवत जिजाऊंची पूजा करण्यात आली आहे तर प्रशासनाच्या वतीने शासकीय पूजा देखील या ठिकाणी घेण्यात आली आहे.

### पुणे-नाशिक महामार्गावर रास्तारोको

**नाशिक :** पुणे सेमी हायस्पीड रेल्वे संगमनेर, अकोले मार्गेच न्यावी, या मागणीसाठी संगमनेर आणि अकोलेकर एकवटले आहेत. पुणे-नाशिक महामार्गावर त्यांनी रास्ता रोको केला आहे. आमदार किरण लहामटे, किसान सभेचे डॉ. अजीत नवले यांच्यासह सर्व पक्षीय नेते आंदोलनात सहभागी झाले आहेत.

### थंडीत वरूण राजाची बरसात

**सांगली :** कडाक्याच्या थंडीने गारठलेल्या सांगलीकरांना वरूण राजाने चिंब करून टाकले. रविवारी रात्रीच्या सुमारास सांगली शहरासह परिसरात अवकाळी पाऊस पडला आहे. अचानकपणे सरीवर सरी कोसळल्याने सांगलीकरांना ऐन थंडीत पाऊसाचा अनुभव मिळाला.गेल्या काही दिवसांपासून थंडीने सांगलीकर गारठून गेले होते.

# जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

## सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार १५ दिवसांची दिली मुदतवाढ

**नवी दिल्ली :** महापालिका निवडणुकांनंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार असून राज्याचं लक्ष तिकडे लागलं आहे. मात्र, निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणुकांसाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केली होती. अखेर, राज्य निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला असून जिल्हा परिषद निवडणुकांसाठी दोन आठवड्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयने ३१ जानेवारीपर्यंत राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते.

राज्यातील जिल्हा परिषद जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्या, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडून सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आला होता. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वेळ दिली होती. मात्र, राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांमध्ये आरक्षण आहे. तर इतर २० जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली असल्यामुळे त्याविषयी काय निर्णय होणार, यावर प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान यावर आज (१२ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली.

या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका पुढे ढकलण्यास परवानगी दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे, आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे निर्देश कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत.



# लाच घेताना दोन पीएसआय गजाआड

**नाशिक :** एका गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवून देण्याच्या नावाखाली दोन लाख रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या शासकीय विश्रामगृहाच्या कॅन्टीन चालकासह त्याच्या मुलाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. धक्कादायक बाब म्हणजे, ही लाच मुंबई नाका पोलीस ठाण्यातील दोन पोलीस उपनिरीक्षकांसाठी स्वीकारली जात होती. याप्रकरणी दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांसह पिता-पुत्रावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार केतन भास्करराव पवार यांच्यावर मुक्या प्राण्याला मारहाण करून अपंग करणे आणि सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी आणि न्यायालयाकडून जामीन मिळावा यासाठी मुंबई नाका पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी पीएसआय दत्तात्रय गोडे आणि पीएसआय अतुल क्षीरसागर यांनी दोन लाख रुपयांची मागणी केली होती.

### नाशिकमध्ये खाकी वर्दीला डाग

पोलीस अधिकाऱ्यांच्या वतीने लाचेची रक्कम स्वीकारण्याचे काम शासकीय विश्रामगृह (सिंहगड) येथील कॅन्टीन चालक रमेश आहिरे (६१) आणि त्यांचा मुलगा कल्पेश आहिरे (२८) यांनी स्वीकारले होते. एसीबीच्या पथकाने विश्रामगृहाच्या पाठीमागील भागात सापळा रचला होता. तक्रारदाराकडून दोन लाखांची रोकड स्वीकारताच या पिता-पुत्राला पथकाने बेड्या ठोकल्या.

लाच स्वीकारणाऱ्या पिता-पुत्राने ही रक्कम पीएसआय गोडे आणि पीएसआय क्षीरसागर यांच्यासाठी घेतल्याचे कबूल केले. लाचखोरीला प्रोत्साहन देणे आणि पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी या दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपअधीक्षक एकनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

# ३५ हजार नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

**मुंबई :** एकीकडे जास्तीत जास्त मुंबईकरांनी मतदानासाठी बाहेर पडावं यासाठी प्रशासन प्रयत्नशील असताना जुहू परिसरातील सुमारे ३५ हजार नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचं जाहीर केलं आहे. जुहू परिसरातील जवळपास २०० इमारतीत राहणाऱ्या नागरिकांनी तसा निर्णय घेतला आहे. मतदानावर बहिष्काराचे अनेक बॅनर जुहू रुईया पार्क, कराची सोसायटी परिसरात लागल्याचं दिसतंय.

जुहू परिसरात मिलिटरी रडार असल्यामुळे त्याचा फटका इथल्या नागरिकांना बसत असल्याचं चित्र आहे. इमारतींचे पुनर्विकास होऊ शकत नसल्याने जवळपास ३५ हजार लोक या धोकादायक इमारतींमध्ये भीतीच्या सावटाखाली राहतात असा दावा करण्यात आला आहे.

# मांजाने चिरला चिमुकल्याचा गळा

**धुळे :** मकर संक्रांतीसाठी अजून काही दिवस बाकी आहेत, पण शहरात पतंगबाजीची लगबग सुरू होताच नायलॉन मांजाचे धोके पुन्हा समोर येऊ लागले आहेत. गेल्या काही दिवसांत या मांजामुळे गंभीर जखमी होण्याच्या घटना वाढल्या असून नागरिकांत चिंता वाढली आहे. धुळ्यात घडलेली एक घटना तर थरकाप उडवणारी ठरली आहे

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर शहरांमध्ये पतंगाच्या मांजाने एका चार वर्षाच्या मुलाचा गळा चिरला गेल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. कपिल पिंपळे असे या मुलाचं नाव असून तो आपल्या नातेवाईकांसोबत मोटर सायकलने जात असताना ही दुर्घटना घडली. मोटर सायकलवरून जात असताना अचानक मांजा रस्त्यात आडवा आला. मोटर सायकलवर पुढे बसलेल्या कपिलच्या गळ्याला पतंगचा मांजा घुसला आणि जोरदार रक्तस्राव सुरू झाला. या मांजामुळे १२ सेंटीमीटर पर्यंत जखम झाल्याने तो गंभीर जखमी झाला.

दरम्यान जखमी झालेल्या कपिलवर धुळ्यातल्या भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. कपिलचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना यश आल आहे. कपिलचा गळा चिरला गेल्यानंतर खोलवर जखम झाली होती. दरम्यान डॉक्टरांनी तब्बल १४ ते १५ टाके घालत कपिलच्या गळ्यावरची शस्त्रक्रिया पूर्ण केली आहे. सध्यस्थितीत कापिलची प्रकृती चांगली असून आयसीयूमध्ये त्याच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता सयाजीराव भामरे यांनी दिली आहे.

नायलॉन मांजावर बंदी असूनही हा मांजा खुलेआम दिसतो. आमच्या मुलासोबत जे घडलं, ते इतर कुणावरही येऊ नये. प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांकडून केली जात आहे. धुळे जिल्ह्यात पतंगच्या मांजामुळे झालेल्या या घटनेमुळे नायलॉन मांजाचा प्रश्न गंभीर बनला असून नायलॉन मांजावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



## अग्रलेख...

# इराणमधील असंतोषाचा अन्वयार्थ

इराणमध्ये नव्याने सुरू झालेल्या आंदोलनाने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. तेथे निदर्शकांविरुद्धच्या सरकारच्या कारवाईत शेकडो लोकांचा बळी गेल्याचे वृत्त असून, त्यामुळे अस्थिरता व अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सामाजिक आणि आर्थिक पृष्ठभूमी असलेल्या नागरिकांच्या सहभागाने अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहेत. इराणची सध्याची परिस्थिती तेथील देशांतर्गत समस्या, अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांशी दीर्घकाळापासून सुरू असलेले तणाव आणि इराणी शासक व पाश्चात्त्य शक्ती यांच्यातील अविश्वासाच्या इतिहासामुळे निर्माण झालेली आहे. इराणमधील निदर्शने एका शहरापुरती किंवा एका सामाजिक गटापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. निदर्शनांत सहभागी असलेल्या नागरिकांमध्ये कामगार, दुकानदार, विद्यार्थी, व्यावसायिक आणि बेरोजगार असे सारेच आहेत. एका तरुणीने सिगारेट ओढताना तिथले सर्वेसर्वा अयातुल्लाह खामेनी यांची प्रतिमा जाळत असल्याचा व्हिडीओ जारी केला. तिचा तो व्हिडीओ जगभर व्हायरल झाला आहे. तेहरानचे युवक आणि युवती देखील, हिजाब परिधान न करता, पाश्चात्त्य संगीतावर नृत्य करीत असल्याचे दिसते आहे. आत्यंतिक धार्मिक बंधने आणि वाढती महागाई ही दोन प्रमुख कारणे या निदर्शनांच्या मागे आहेत. इराणमध्ये महागाई फार वाढली आहे. अन्न, इंधन, भाडे आणि औषधे महाग होत आहेत. इराणी चलनाचे मूल्य कमी झाले आहे. लोकांना नोकऱ्या शोधण्यासाठी किंवा त्यांच्या कुटुंबांच्या पालनपोषणासाठी जास्त संघर्ष करावा लागत आहे. या समस्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या असल्यामुळे व्यापक निराशेचे वातावरण आहे. अर्थव्यवस्थेच्या पलीकडे आणखीही काही विषय आहेत. इराणी शासन-प्रशासन व्यवस्थेत भ्रष्टाचार, पारदर्शकतेचा अभाव आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध हे ते विषय. इराणच्या सरकारने मोठ्या संख्येने सुरक्षा दले तैनात केली. अनेक निदर्शकांना अटक करण्यात आली आहे. संपर्क मर्यादित करण्यासाठी इंटरनेट आणि मोबाईल सेवा प्रतिबंधित किंवा बंद करण्यात आल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा राखण्यासाठी ही पावले आवश्यक आहेत असा सरकारचा युक्तिवाद आहे. ही आंदोलने प्रतिकूल परकीय शक्तींनी घडवून आणल्याचे सरकार म्हणते. अमेरिका, इस्रायल आणि काही पाश्चात्त्य गुप्तचर संस्थांवर तिथले सरकार संशय व्यक्त करीत आहेत. अमेरिका आणि काही युरोपीय देशांनी इराणी नागरिकांच्या शांततापूर्ण निदर्शनांच्या अधिकाराला पाठिंबा दर्शविला आहे. इराणच्या सरकारकडून होत असलेला बळाचा वापर आणि इंटरनेट बंद करण्यावर टीकाही केली आहे. मात्र, विदेशी शक्ती निदर्शनांना प्रोत्साहन किंवा निधी देत आहेत, असा कुठलाही पुरावा अद्याप गवसलेला नाही. निदर्शकांच्या मागण्या प्रामुख्याने देशांतर्गत आर्थिक आणि राजकीय मुद्यांवर केंद्रित आहेत. तरीही यात परकीय हस्तक्षेप नसेलच, असे मानण्याचे कारण नाही. इराण आणि अमेरिकेत अनेक दशकांपासून शत्रुत्व आहे. इराणचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि प्रादेशिक संघर्षांमध्ये त्याचा सहभाग हा देखील मुद्दा आहेच. पण, त्या देशाच्या नागरिकांचा असंतोष हेच त्याचे मूळ कारण.

अनेक दशकांपूर्वी झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणने ज्या राजकीय-धार्मिक व्यवस्थेला स्वीकारले, ती व्यवस्था आजच्या तरुण पिढीला कालबाह्य, दडपशाही करणारी आणि स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारी वाटू लागली आहे. इराणची लोकसंख्या तुलनेने तरुण आहे. या तरुणांनी जागतिकीकरण पाहिले आहे, इंटरनेटच्या माध्यमातून जगाशी संपर्क साधला आहे आणि त्यामुळे त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. राज्यकर्त्यांची मानसिकता मात्र अजूनही जुन्या काळातील क्रांतीच्या आठवणीत अडकून पडलेली दिसते. इराणमधील सत्ताधिकार सर्वोच्च धार्मिक नेत्याकडे आहे. अयातुल्लाह खामेनी यांच्याकडे असलेले अधिकार हे निवडणूक प्रक्रियेच्या पलीकडचे आहेत. त्यामुळे जनतेच्या अपेक्षा आणि सत्ताधाऱ्यांचे निर्णय यांच्यातील दरी वाढत चालली आहे. या पृष्ठभूमीवर सुरू झालेली आंदोलने ही केवळ महागाईविरोधी किंवा हिजाबविरोधी नाहीत, तर त्या व्यवस्थेविरोधातील बंडाचे स्वरूप धारण करीत आहेत. यापूर्वीही अनेकदा इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली होती. प्रत्येक वेळी सरकारने ती कठोरपणे चिरडली. मात्र, यावेळी परिस्थिती वेगळी आहे. या आंदोलनाला केवळ शहरांपुरते किंवा विशिष्ट वर्गापुरते मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. ग्रामीण भाग, निमशहरी क्षेत्रे आणि पारंपरिकदृष्ट्या सरकारसमर्थक मानले जाणारे वर्गही असंतोष व्यक्त करीत आहेत. इराणचे सरकार परकीय हस्तक्षेपाचा मुद्दा सातत्याने पुढे करीत आहे. इतिहास लक्षात घेता, इराणचा हा संशय पूर्णपणे निराधारही म्हणता येत नाही. इराणचे अणुकार्यक्रम, इस्रायलविरोधी भूमिका, हिजबुल्ला आणि हमाससारख्या संघटनांना दिला जाणारा पाठिंबा आणि आखाती प्रदेशातील प्रभाव वाढवण्याचे प्रयत्न यामुळे अमेरिका आणि त्याचे मित्रदेश अस्वस्थ आहेतच. त्यामुळे इराणमध्ये अस्थिरता वाढल्यास त्याचा अप्रत्यक्ष फायदा अमेरिकेला होऊ शकतो.

यासंदर्भात विचार करताना इराणच्या भौगोलिक परिस्थितीचा प्रादेशिक परिणामही लक्षात घ्यावा लागेल. इराण हा मध्य पूर्व, मध्य आशिया आणि दक्षिण आशिया यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणावर तेलवाहतूक होते. इराणमध्ये दीर्घकालीन अस्थिरता निर्माण झाली, तर जागतिक ऊर्जा बाजारावर त्याचा परिणाम होईल. तेलाच्या किमती वाढतील, महागाई वाढेल आणि त्याचा फटका भारतासारख्या देशांना बसेल. त्यामुळे इराणमधील अंतर्गत प्रश्न हे केवळ त्या देशापुरते मर्यादित म्हणता येणार नाहीत आणि त्यामुळे कोणत्याही एका बाजूने मत व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. भारताने नेहमीच आपले राष्ट्रीय हित केंद्रस्थानी ठेवून धोरण ठरवले आहे. इराणच्या बाबतीतही भारताला हेच करावे लागेल. मानवी हक्कांचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही, पण त्याचवेळी इराणशी असलेले ऐतिहासिक आणि धोरणात्मक संबंधही धोक्यात येऊ देणे भारताच्या हिताचे नाही. महागाई आणि सामाजिक निर्बंधांवरून तसाही तिथल्या निदर्शकांचा मुद्दा सत्तापालटापर्यंत पोहोचू लागलेला आहे. अशा स्थितीचा फायदा अमेरिका घेऊ शकेल. तसे झाले तर इराणमध्ये सध्या असलेली अस्थिरता आणखी वाढेल. त्याचा प्रभाव भारतावर देखील पडू शकतो. भारताने मध्य आशिया, रशिया आणि युरोप या प्रदेशात अस्तित्व निर्माण करण्यासाठी काही प्रकल्पांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. चाबहार बंदर हा त्यातील एक प्रकल्प. पाकिस्तानला बायपास करून अफगाणिस्तान आणि मध्य आशियात भारताला थेट प्रवेश मिळवून देईल असा हा प्रकल्प. भारताच्या प्रादेशिक व्यापार धोरणाचा भाग म्हणून नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर हे जाळे उभारले जात आहे. इराणच्या माध्यमातून भारताला रशिया आणि युरोपशी जोडू शकेल असा प्रकल्प. भारत आणि इराण यांच्यात मोठा व्यापारही होतो. इराणमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली तर भारताच्या या सर्व प्रकल्पांवर आणि व्यापारावर परिणाम होईल. त्यामुळे भारताला इराणमधील वर्तमान संकटाच्या संदर्भात फार सावध पावले उचलावी लागतील. आधीच अमेरिकेने भारताचा छळ सुरू केलेला आहे. भारताने थेट इराणची बाजू घेतली तर त्यातून गुंतागुंत निर्माण होईल. भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नांना खीळ बसेल ती वेगळी. मध्य आशियाच्या हृदयस्थळी इराण वसलेला आहे. तेथील अस्थिरता ही सागरी वाहतूक, आखाती भागातील स्थिरता आणि त्या भागातील भारतीयांच्या दृष्टीनेही संकट निर्माण करणारी ठरू शकेल. त्यामुळे भारताला मुत्सद्दीपणा दाखवावा लागेल. भारताचे इराणशी जुन्या काळापासून संबंध आहेत. अमेरिकेशी असलेले संबंध पूर्णपणे तुटलेले नाहीत आणि तुटण्याची शक्यता नाही. इस्रायलशीही भारताचे संबंध आहेत. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या भाषेत असे म्हणतात की, धोरणात्मक स्वायत्तता हे संकटातून तरून जाण्यासाठीचे माध्यम असते. तीच यावेळी पुन्हा भारताला दर्शवावी लागेल.

## दिल्ली दिनांक

### रवींद्र दाणी

# तेलाचा जागतिक वणवा!

८८५ वर्षे कच्चे तेल उत्पादनाची क्षमता असणाऱ्या व्हेनेझुएलावर कब्जा करून अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला धक्का दिला. या देशाजवळ ३०४ बिलियन बॅरल एवढा प्रचंड भूमिगत तेलसाठा आहे तर तेल उत्पादनात दुसऱ्या क्रमाकांवर असणाऱ्या सौदी अरेबियाजवळ भरपूर तेलसाठा असला तरी तो फक्त ८१ वर्षे पुरेल एवढा आहे आणि ज्या रशियाकडून भारताने तेल आयात बंद करावी अशी मागणी ट्रम्प करीत आहेत, त्या रशियाजवळ तर फक्त २२ वर्षे पुरेल एवढाच तेलसाठा शिल्लक आहे.

**रिलायन्सचा इन्कार :** रशियाचे कच्चे तेल असणारी तीन मालवाहू जहाजे जामनगरच्या वाटेवर आहेत असे एक वृत्त प्रसिद्ध होताच, रिलायन्स समूहातर्फे याचा इन्कार करण्यात आला. मागील तीन आठवड्यांत आमच्याकडे रशियाचे कच्चे तेल आलेले नाही आणि जानेवारी महिन्यात तरी ते येण्याची शक्यता नाही असेही या समूहाने जाहीर केले. भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करण्यात मोठी कपात केली आहे याचा हा पुरावा मानला जातो.

**३८ टक्के कपात :** भारताने रशियाकडून तेल आयात बंद केली नसली तरी या आयातीत जवळपास ३८ टक्के कपात केली आहे. वास्तविक भारत ही कपात करण्यास राजी नव्हता. पण, नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेने रशियन जहाज कंपन्या व बँकांवर कडक- कठोर आर्थिक निर्बंध लावल्यानंतर भारतातील तेल कंपन्यांना रशियन तेलाची आयात घटविण्याशिवाय पर्याय उरला नव्हता असे समजते.

**सर्वाधिक आयात :** २०२४ मध्ये भारताने रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल आयात केले, जे भारताच्या एकूण आवश्यकतेच्या ३१ टक्के होते. नंतर राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारताला ही आयात कमी करण्याचा सल्ला दिल्यानंतरही भारताने आपल्या धोरणात बदल न करता रशियातून कच्च्या तेलाची आयात सुरू ठेवली होती. भारताचा निर्णय योग्य असाच होता. कारण, एक सार्वभौम देश म्हणून कोणत्या देशातून काय आयात करावयाचे हा शेवटी भारत सरकारचा अधिकार आहे. मात्र, आता कच्चे तेल भारतात आणण्याऱ्या जहाज कंपन्या व याबाबतचे आर्थिक व्यवहार करणाऱ्या बँका यावरच अमेरिकेने कडक आर्थिक निर्बंध लावल्यानंतर भारतीय सार्वजनिक उपक्रमातील कंपन्या व रिलायन्स उद्योग यांना रशियन कच्च्या तेलाची आयात घटवावी लागली.

**केवळ तेलासाठी :** सौदी अरेबिया हा कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा उत्पादक व निर्यातक मानला जात असला तरी भूमिगत कच्च्या तेलाचा सर्वाधिक साठा व्हेनेझुएला या देशात आहे. सौदी अरेबियाचा भूमिगत तेलसाठा ८१ वर्षे पुरेल एवढा आहे तर त्या तुलनेत व्हेनेझुएलाचा तेलसाठा ८८५ वर्षे पुरेल एवढा प्रचंड आहे. जगातील एक पंचमांश टक्के तेलसाठा केवळ या एका देशात आहे. सध्या व्हेनेझुएला दररोज एक मिलियन म्हणजे १० लाख बॅरल तेलाचे उत्पादन करतो. हे प्रमाण कायम ठेवल्यास व्हेनेझुएला ८८५ ते ९०० वर्षे तेल उत्पादन करू शकतो. सौदी अरेबियाने प्रगत तंत्रज्ञान वापरून आपल्या तेलसाठ्याचा योग्य तो वापर केला. याने सौदी अरेबियाची भरभराट झाली. त्या तुलनेत व्हेनेझुएलाने आपल्या तेलसाठ्याकडे दुर्लक्ष केले आणि हा देश अतिगरीब म्हणून ओळखला जाऊ लागला. व्हेनेझुएलावर काही प्रमाणात रशियाचे नियंत्रण होते. त्याला शह देण्यासाठी राष्ट्रपती ट्रम्प यांनी नववर्षाच्या प्रारंभी या देशाच्या राष्ट्रपतींचेच 'अपहरण' केले. आता व्हेनेझुएलाच्या राष्ट्रपतींवर न्यू यॉर्कच्या न्यायालयात मादक पदार्थांच्या व्यवहारात सामील असल्याबद्दल खटला चालविला जाणार आहे. अमेरिकेने तेथे सत्ताबदल केल्यानंतर या देशात काय काय घडामोडी घडतात हे दिसण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलातील कच्च्या तेलाचे उत्पादन करण्यासाठी मोठ्या अमेरिकन कंपन्यांना तेथे पाठविण्याची घोषणा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केली आहे. ट्रम्प यावरच थांबलेले नाहीत. त्यांनी पुन्हा एकदा भारत, रशियाकडून आयात करीत असलेल्या कच्च्या तेलाचा मुद्दा उपस्थित केला आहे. भारताने ही आयात बंद न केल्यास, आपल्याला पुन्हा भारताविरोधात काही निर्णय घ्यावे लागतील असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. भारताने रशियाकडून तेल आयातीत घट केल्याची बातमी काही प्रमाणात त्यांची नाराजी दूर करू शकते. भारताच्या या निर्णयावर आपण नाराज आहोत असे ते वारंवार सांगत आहेत. रशियाकडून भारतात आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाचा मुद्दा सोडण्यास ते तयार नाहीत.

**बांगलादेश :** भारत-अमेरिका संबंधात जेवढी कटुता आली आहे, त्यापेक्षा जास्त कटुता भारत-बांगलादेश संबंधात आली आहे. यात पडद्यामागे चीन व पाकिस्तान फार मोठी भूमिका बजावीत आहेत. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य केले जात असताना, या देशाने एका क्रिकेट स्पर्धेसाठी भारतात आपला चमू पाठविण्यास नकार दिला. ही एक मोठी घटना मानली जाते. बांगलादेशला भारतविरोधी निर्णय घेण्यास पाकिस्तान व चीन जणू या देशाला भाग पाडीत आहेत आणि तेथील अस्थायी सरकार या दोन्ही देशांचे कठपुतले बनले आहे. पाकिस्तानला १९७१ च्या आपल्या विभाजनाचा हिशेब चुकता करावयाचा आहे तर चीनला भारताचा एक मित्र कमी करावयाचा आहे. दोन्ही देश सध्या भारताच्या विरोधात संयुक्त उपक्रम राबवीत आहेत असे दिसते.

**ट्रम्प यांची नाराजी :** भारत-अमेरिका संबंधात जो तणाव आला आहे तो कमी होणे आवश्यक असल्याचे नवी दिल्लीत मानले जाते. दोन्ही देशांच्या संबंधात एवढी कटुता कधीही निर्माण झाली नव्हती, जी ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात निर्माण झाली आहे.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी अचानक भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे खरे कारण, रशियाकडून भारत आयात करीत असलेले कच्चे तेल हे नाही तर ट्रम्प यांचा अहंकार हे आहे. त्यांच्या अहंकाराला धक्का बसला तो भारत-पाकिस्तान संघर्ष टाळण्यात त्यांची 'मध्यस्थी' भारताने नाकारल्यानंतर. भारत-पाकिस्तान युद्ध थांबविण्यात ट्रम्प यांनी खरोखरीच काही भूमिका बजावली होती काय याचे उत्तर भारत सरकारजवळच असू शकते. राष्ट्रहित विचारात घेता भारत सरकार ते उघड करू शकत नाही हेही एक सत्य आहे. याउलट पाकिस्तानने हा संघर्ष संपविण्याचे सारे श्रेय राष्ट्रपती ट्रम्प यांना दिले. याने ते निश्चितच सुखावले आणि भारताने ते नाकारल्याने ट्रम्प भारतावर रागावले.

**आता चीनचाही दावा :** मागील आठवड्यात चीननेही असाच दावा केला आहे. भारत-पाकिस्तान संघर्ष थांबविण्यात आम्हीही मध्यस्थी केली असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. या दाव्यात किती तथ्य आहे याची कल्पना नाही, पण या युद्धासाठी चीनने पाकिस्तानला गोळाबारुद पुरविला हे मात्र सत्य आहे. पाकिस्तानने भारताच्या विरोधात वापरलेली ८१ टक्के शस्त्रे-प्रक्षेपणास्त्रे चिनी होती हे सिद्ध झालेच आहे.

**सलोखा आवश्यक :** भारत-अमेरिका संबंधात म्हणजे ट्रम्प- मोदी संबंधात बिघाड आणणारे खरे मुद्दे कोणते आहेत याची भारत सरकारला पूर्ण जाणीव आहे. त्यातील काही मुद्यांवर आता काहीही करता येणार नाही हेही भारत सरकारला माहीत असावे. जगाचे सत्तासंतुलन फार बिघडू नये आणि याचा फायदा चीनने उठवू नये हे भारताच्या हिताचे आहे. बांगलादेशची भारताच्या विरोधातील मुजोरी आणि पाकिस्तानची मग्रुरी चीनच्या पाठिंब्याशिवाय सुरू नाही हे तर सर्वांच्याच लक्षात येत आहे. आता वेळ आली आहे, चीनला शह देण्यासाठी भारताने अमेरिकेशी सलोखा करण्याची.

## वेध

### अनिल उमाकांत फेकरीकर

# लोको पायलट तुपाशी, एसटी चालक उपाशी

'माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हीच आमुची प्रार्थना, हेच अमुचे मागणे,' असे म्हणत आपणच सर्वांना समान लेखण्याचा विचार मांडतो. पण प्रत्यक्षात व्यवस्थाच समान काम करणाऱ्यांमध्ये तुलना करीत, त्यांना वेगवेगळे मापदंड लावत असते. याच कारणाने आज भारतीय रेल्वेत कार्यरत लोको पायलट तुपाशी, तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक उपाशी आहेत. हा प्रकार किती दिवस सहन केला जावा, यावर आता उपाययोजना करायची वेळ आलेली आहे. महाराष्ट्रात एसटी महामंडळात १ लाख २ हजारपेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. यात १५ हजारांपेक्षा जास्त चालक कार्यरत आहेत. एसटी गाड्यांची संख्या १८ हजार ४४९ आहे. दररोज एसटीतून सरासरी ७० लाख प्रवासी प्रवास करून आपल्या घरी सुरक्षितपणे जातात. ही सेवा त्यांना राज्यातील २४७ आगार आणि ५७८ बसस्थानकांमार्फत मिळत आहे. सर्व एसटीचा डोलारा हा पूर्णतः चालकांच्या कौशल्यावरच चालतो. एसटी चालकाच्या पगाराची सुरुवात ही १७ ते २० हजार रुपयांनी होते. त्यांना राज्यात सर्वत्र बस न्यावी लागते. रात्रीला मुक्कामही करावा लागतो. पूर्वी रात्रीला चालक आणि वाहकाने मुक्काम केल्यास केवळ ७ रुपये मिळायचे. पण आता ती रक्कम ७० रुपये झाली आहे. चालक आणि वाहकांना गणवेश धुण्यासाठी महिन्याला १०० रुपये मिळतात. रात्री ग्रामीण भागात मुक्काम करायचा असेल तर दोघांनाही गाडीतच झोपावे लागते. तिथे डासांचे प्राबल्य शिवाय प्रसाधनगृह नसल्याने त्यांना अनंत यातना होतात. परिणामी त्यांची झोप अपुरी होते. त्याचाही परिणाम सेवेवर होतो. याचा विचारच केला जात नाही. त्याचवेळी रेल्वेतील लोको पायलटला मात्र क्लास वननुसार सोईसुविधा मिळतात. लोको पायलटवर हजारो प्रवाशांची जबाबदारी असते. अगदी अशीच जबाबदारी एसटीत कार्यरत चालकांवरही असते. केवळ प्रवाशांची संख्या कमी असते. पण रेल्वेतील प्रवासी आणि एसटीतून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा जीव सारखाच आहे ना? मग दोघांची जबाबदारी सारखीच असल्याने सोईसुविधांमध्ये भेदभाव का करायला हवा, हाच आजचा मुद्दा महत्त्वाचा आहे.

लोको पायलटला सुविधा मिळते त्याला कुठल्याही सुज्ञ व्यक्तीचा विरोध नाही. कारण तेही फार मोठे कार्य करीत आहेत. पण त्यांचा जेव्हा तुम्ही चांगला विचार करता तेव्हा एसटी महामंडळातील चालकांचा आणि वाहकांचा विचारही माणसासम करायला हवा ना? ग्रामीण भागात बहुतांश गावात समाजभवनाची निर्मिती झालेली आहे. तिथे ग्रामपंचायतींनी चालक आणि वाहकांसाठी सोईसुविधा द्यायला हव्यात. नव्हे तसाच करार एसटी महामंडळाशी झालेला आहे. पण त्याचे कुणीही पालन करीत नाही. उलट एसटी चालक आणि वाहकाशी आपल्याला काय देणे-घेणे असे म्हणत ग्रामपंचायतसुद्धा त्यांच्याकडे दुर्लक्ष करते. म्हणजे तिकडे महामंडळ सोईसुविधा देत नाही, तर ज्यांनी करार केला तेही त्याचे पालन करीत नाही. या स्थितीत चालक आणि वाहकांचा विनाकारण बळी जातो. त्याचवेळी आपला लोको पायलट सुरक्षित आणि तणावमुक्त राहावा यावर भारतीय रेल्वे विशेष भर देते. त्यांच्या कुटुंबीयांना समुपदेशन करून तुमचा पती अर्थात लोको पायलट देशासाठी किती महत्त्वाचा हे पटवून देते. येथे उलटेच आहे. एसटी महामंडळात चालकाने अपघात केल्यावर त्याचे समुपदेशन केले जाते. त्याला चूक पुन्हा करू नको म्हणून प्रशिक्षण दिले जाते. मग तीच गोष्ट एसटी महामंडळात अपघातापूर्वी का नाही केली जात, यावरही संशोधन करावे लागेल. एसटी महामंडळानेही चालक आणि वाहकांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून त्यांचे समुपदेशन करायला हवे. त्यांनाही 'तणाव ठेवा घरी, गाडी चालवा बरी' याचे सूत्र समजावून सांगायला हवे. एसटी चालकही दररोज ३०० किलोमीटर वाहन चालवितो. त्यालाही बसमधील सरासरी ७० प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या गावी सोडायचे असते. त्यांचेही कार्य सोपे नाही.

रेल्वेची स्वतःची यंत्रणा फूलप्रूफ आहे. रेल्वे रुळांवर चालते तर एसटी चालकाला रस्त्यावरील यमांच्या मधून सुरक्षितपणे मार्ग काढून प्रवास करावा लागतो. तसे पाहता एसटी चालकांचे कार्य महाकठीण आहे. असे महाकठीण कार्य दररोज न चुकता व्यवस्थित जे चालक करतात, त्यांचा व्यापक दृष्टिकोनातून विचार व्हायला हवा. त्यांनाही चांगला पगार, सोईसुविधा द्यायला हव्यात. चालकांनाही आपल्या कार्यावर अभिमान वाटावा अशी एसटीची नोकरी भविष्यात व्हावी. जेव्हा असे होईल त्या दिवशी खरोखरच आपल्या महाराष्ट्रातील लालपरीने प्रवास करणारेही सुखावतील अन् चालक मनोमन महामंडळाचे आभार मानतील.

९८८१७१७८५९

## कानोसा

### अमोल पुसदकर

# स्वामी विवेकानंदांची भारतभक्ती

१६ जानेवारी १८९७ रोजी कोलंबो येथील फ्लोरल हॉल या ठिकाणी स्वामी विवेकानंदांनी आपले पहिले विदेशातील जाहीर व्याख्यान दिले होते. आपल्या या भाषणात ते म्हणतात की, पूर्वी कदाचित भावनेच्या भरामध्ये ज्यावर मी विश्वास ठेवीत असे, ते आता माझ्यासाठी ठाम प्रमाण सिद्ध सत्य होऊन बसले आहे. पूर्वी सगळ्या हिंदूंप्रमाणे मलाही वाटत असे की भारत पुण्यभूमी आहे, भारत ही कर्मभूमी आहे. परंतु आज आपल्या समोर उभा राहून मी अगदी ठासून सांगू शकतो की हे सत्य आहे, नितांत सत्य आहे, त्रिवार सत्य आहे. या पृथ्वीच्या पाठीवर जर असा कोणता देश असेल की ज्याला पुण्यभूमी हे गोड नाव यथार्थपणे देता येईल; जर असे कोणते एखादे स्थान असेल की जिथे जगामधील सर्व जीवांना आपल्या कर्मफलाचा उपयोग घेण्यासाठी यावे लागेल; जर असे एखादे ठिकाण असेल की भगवत लाभाची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येकाला अंती जिथे येऊन दाखल व्हावेच लागेल; जर असे एखाद्या स्थान असेल जिथे माणसात कोमलता, शुचिता, दया, दाक्षिण्य, क्षमा इत्यादी सद्‌गुणांचा इतर कुठल्याहीपेक्षा अधिक विकास झाला आहे; जर अशी कोणती एखादी भूमी असेल जिला अंतर्दृष्टीचे आणि आध्यात्मिकतेचे माहेरघर म्हणता येईल तर ती म्हणजे आपली ही मायभूमी भारतच होय.

भारत आणि भारतीयांबद्दल स्वामीजींच्या मनामध्ये अत्यंत प्रेम होते. परंतु इतर देश, त्यांची संस्कृती, त्यांची सभ्यता पाहिल्यानंतर त्यांना असे लक्षात आले की, चार-दोन यंत्र बनविणाऱ्या या लोकांचा आपण इतका उदो-उदो करत आहोत, परंतु त्यांचा माणूस म्हणून अद्याप फारसा विकास झालेला नाही. ते म्हणतात की, कोट्यवधी स्त्री-पुरुषांच्या जीवनाचा दाह करणारा, त्यांची हृदये करपून टाकणारा जडवादाचा अग्नी विझविण्याचे सामर्थ्य असलेला अमृतोपम शांतिजलाचा अक्षय ठेवा एक मात्र या आपल्या भारत भूमीतच विद्यमान आहे. जगामधील विविध धर्म, त्यांची कार्यपद्धती, त्यांचे अनुयायी पाहिल्यानंतर स्वामीजी म्हणतात की, परधर्म सहिष्णुता ही गोष्ट जगाने भारतापासूनच शिकायला हवी. ते म्हणतात की, हीच केवळ भूमी आहे ज्या भूमीमध्ये आम्ही मुसलमानांना मशीद बांधून दिलेली आहे, ख्रिश्चनांसाठी आम्ही चर्च बांधलेले आहे. त्यामुळे परधर्म सहिष्णुता जर कोणाला जगात कुठेही बघायची असेल तर ती केवळ या भारत भूमीतच बघता येईल.



ते म्हणतात की, एखाद्या मुस्लिम राष्ट्रामध्ये एखाद्या ख्रिश्चनाला चर्च बांधून मिळणार नाही आणि ख्रिश्चन राष्ट्रांमध्ये सुद्धा तेथील लोक एखाद्या मुस्लिम धर्मीयाला मशीद बांधून देणार नाही. परंतु आमच्या देशातील सभ्यता अशा पद्धतीची आहे की तिने परमेश्वराला कुठल्याही नावाने हाक मारणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या त्याच्या उपासना पद्धतीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यांची प्रार्थनागृहे सुद्धा आम्ही बांधून दिलेली आहे. स्वामीजी म्हणतात की, संपूर्ण विश्वामध्ये धर्माच्या नावावर केवळ तिरस्कार आणि विद्वेष सुरू आहे. त्या सर्वच लोकांनी भारताच्या आश्रयाला आले पाहिजे आणि येथून शिक्षण ग्रहण केले पाहिजे. स्वामीजी म्हणतात, आपला भारतच जगाला अध्यात्माचे पसायदान देणार आहे.

स्वामीजी म्हणतात की, प्राचीन आणि वर्तमानकाळी काही जातींच्या जीवनाच्या लोंढ्याबरोबर महान शक्तिशाली सत्यांची बीजे इकडे-तिकडे विखुरली गेली आहेत. पण माझ्या मित्रांनो, लक्षात ठेवा त्या साऱ्यांचा प्रचार झाला आहे रणशिंगाच्या कर्कश निनादाने, रणसाज चढविलेल्या बेगुमान सैनिकांच्या धुमाळीमध्ये, मानवी रक्तात भिजविल्याशिवाय लाखो बांधवांचे रक्त सांडविल्याशिवाय यातील कोणतीही जात दुसऱ्या जातीला आपला विचार व सिद्धांत देऊ शकलेली नाही. यातील प्रत्येक ओजस्वी सिद्धांताच्या प्रचाराबरोबरच उठले आहेत लाखोगणती निरपराध लोकांचे हाहाकार, उसळले आहेत अनाथ बालकांचे चित्कार, वाहिले आहेत दीन विधवांचे अश्रू. परंतु भारत या उपायांची कास न धरताही हजारो वर्षे जिवंत आहे.

स्वामीजी म्हणतात, आमचे राष्ट्र अति प्राचीन राष्ट्र आहे. जेव्हा ग्रीस अस्तित्वात देखील नव्हता, रोम अजून जन्माला यायचा होता, ज्यावेळी आधुनिक युरोपियन यांचे पूर्वज जर्मनीच्या घनदाट जंगलात असभ्य दशेत खितपत, निळ्या रंगाने आपली अंगे रंगवीत असत, तेव्हाही त्याकाळीही भारत क्रियाशील होता. इतिहासाला ज्या काळाची माहिती नाही, दंतकथा ही ज्या काळाच्या घनांधकाराचा भेद करू शकत नाही त्या अति प्राचीन काळापासून वर्तमान काळापर्यंत कल्पनामागून कल्पना आणि सिद्धांतांमागून सिद्धांत, विचारांमधून विचार या भारतातून बाहेर गेले आहेत. परंतु त्या सर्वांच्या, त्यातील प्रत्येकाच्या पुढे शांती आणि मागे आशीर्वाद होता.

स्वामी विवेकानंद हे योद्धा संन्यासी होते. त्यांना जीवनाच्या सर्वच स्तरांमध्ये संघर्ष करावा लागला. ते जगविख्यात झाले, परंतु त्यांचा प्रवास हा सोपा नव्हता. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे जेव्हा त्यांना नोकरीची आवश्यकता होती तर त्याही वेळेस कोणी त्यांना मदत केली नाही. स्वतःच्या भरवशावर ते ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून लागले होते. परंतु तेथील राजकारणाने त्यांना शाळा सोडण्यास बाध्य केले. जेव्हा ते अध्यात्माकडे आकर्षित झाले त्यावेळेस बुद्धीमधील नाना तर्क आणि कुतर्क, समाजबांधवांनी त्यांची केलेली उपेक्षा, कौटुंबिक अडचणी या सर्व पृष्ठभूमीवर संन्यासी होणे हे सुद्धा त्यांच्यासाठी सोपे नव्हते. सर्वधर्म परिषदेसाठी शिकागोला जाण्यासाठी सुद्धा जे मदत करतील असे वाटत होते त्यांनी सुद्धा मदत केली नाही. कसेबसे अमेरिकेला पोहोचल्यावर तेथे सुद्धा त्यांना राहणे, खाणे आणि इतर व्यवस्था करण्यासाठी संघर्ष करावा लागला. स्वामीजी म्हणतात, येणारी ५० वर्षे तरी भारत माता ही आपल्यासाठी सर्वोच्च आराध्य देवता असायला पाहिजे. आजही धर्मांध आणि कट्टरवादी शक्ती भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात थैमान घालीत आहेत. त्यांच्यामुळे शांत आणि सहिष्णू लोकांचे जीवन धोक्यामध्ये येत असते. बांगलादेशमध्ये घडणाऱ्या अत्याचाराच्या घटना या आपल्याला हेच सांगत आहेत. स्वामीजींनी या असहिष्णू लोकांना ओळखले होते. विश्वाच्या शांतीसाठी हे लोक धोका आहेत हे सुद्धा त्यांनी ओळखले होते. स्वामीजींनी आपल्या देशबांधवांना तुम्ही द्वेष आणि मत्सराचा त्याग करा हा संदेश दिलेला आहे. स्वामीजींच्या जयंतीनिमित्त देशामध्ये आणि विदेशामध्ये काम करणाऱ्या सर्व भारतप्रेमी शक्तींनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. स्वामी विवेकानंदांचे शक्तिशाली भारताचे स्वप्न, जगद्‌गुरू भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी भारत मातेच्या सुपुत्रांनी प्राथमिकतेने, परिश्रमपूर्वक तन-मन-धन समर्पित करून कार्य करणे हे स्वामी विवेकानंदांचे कृतज्ञ स्मरण ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## महान तत्त्वज्ञ, समाजसुधारक स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारतातील महान तत्त्वज्ञ, समाजसुधारक आणि युवकांचे प्रेरणास्थान होते. त्यांनी भारतीय संस्कृती, वेदांत तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांचा संदेश केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात पोहोचवला. त्यांचे विचार आजही मानवजातीला दिशा देणारे आहेत. स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त होते. वडील विश्वनाथ दत्त हे वकील होते, तर आई भुवनेश्वरी देवी धार्मिक आणि संस्कारशील होत्या. लहानपणापासूनच नरेंद्रनाथ बुद्धिमान, धाडसी आणि प्रश्न विचारणारा स्वभावाचा होता. आध्यात्मिक सत्याचा शोध घेण्याची तीव्र जिज्ञासा त्यांच्यात होती. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवाचा सर्वांगीण विकास. आत्मोन्नती, सामाजिक सेवा, राष्ट्रप्रेम आणि आध्यात्मिक जागृती या मूल्यांवर त्यांनी भर दिला. त्यांनी तरुणांना दुर्बलता सोडून सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि भारताला आत्मगौरवाची भावना दिली. स्वामी विवेकानंद यांचे विचार हे केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नाहीत, तर आजच्या युगातही तितकेच मार्गदर्शक आहेत. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी आत्मविश्वास, ज्ञान, सेवा आणि मानवता या मूल्यांचा अंगीकार करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब केल्यास एक सशक्त, सुसंस्कृत आणि प्रगत समाज निर्माण होऊ शकतो. स्वामी विवेकानंद यांचे जीवन त्याग, सेवा आणि विचारांचे प्रतीक होते. त्यांनी युवकांना ''उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका'' असा संदेश दिला. त्यांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनद्वारे आजही समाजसेवेचे कार्य सुरू आहे. स्वामी विवेकानंद हे केवळ संन्यासी नव्हते, तर ते राष्ट्रनिर्माते होते. त्यांच्या विचारांतून आत्मबल, राष्ट्रीय एकात्मता आणि मानव कल्याणाची प्रेरणा मिळते. आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज आहे. स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि विचार हे प्रत्येक भारतीयासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### प्रभाग पद्धतीचे फायदे व तोटे




फार आधी महानगरपालिकेची निवडणूक वॉर्ड स्तरावर व्हायची. तीन चार वस्त्या मिळून ५०००/५५०० हजार मतदार राहायचे. मग दोन वॉर्डांचा प्रभाग झाला तर प्रभागाचा विस्तार वाढला व मतदार २०००० पर्यंत झाले. मग आला चार वॉर्डांचा प्रभाग. विस्तार खूप मोठा (आमचा प्रभाग १३ हा १६ किलोमीटर पसरलेला आहे) मतदार ६००००च्या आसपास.

फायदे : आपापल्या गल्लीत स्वयंभू नेते असणारे व शे-दीडशे मतदान मिळवू शकणारे उभे राहात नाहीत. पक्षांतर्गत बंडाळी कमी झाली.

तोटे : या उक्तीनुसार चारही नगरसेवक आपापले काम व्यवस्थित करत नाहीत.

काम न झाल्यास मिळणारी उत्तरे ''हा माझा भाग नाही'', ''तो त्याचा भाग आहे'', ''मला वाटले तो करेल'' म्हणजे जबाबदार चारपैकी एकही नाही. प्रभागाचा पसारा मोठा असल्याने प्रत्यक्ष जनसंपर्क व महिन्यातून एकदा तरी एक भाग फिरून तिथल्या समस्या जाणून, सोडवण्याचा प्रयत्न होऊ शकत नाही. ही एक मिनी आमदाराची निवडणूक होते. पैसा, मनुष्यबळ याची आवश्यकता पाहता सामान्य समाजसेवक निवडणूक लढवू शकत नाही, लढला तर जिंकणे कठीण होते.

आज सर्वोदयी नेते मा. ज. कानेटकरांची आठवण होते. आम्ही लहान असताना एक धोतर, कोट घालून व पिशवी घेऊन एक आजोबा मैदानात आले. त्यांनी पाच रुपयांची पिशवी व पन्नास रुपये निवडणूक अनामत जमा केल्याची पावती दाखवली. त्यांचे चिन्ह शिडी असल्याने आमची वानरसेना शिडी खांद्यावर तिरडीप्रमाणे घेऊन ओरडत फिरायला लागलो. आमच्यातला जरा मोठा व समजदार कृष्णा बावणेने हे आमचे धंदे बंद केले व कानेटकर आजोबांना त्यांच्या निवडणुकीत उभे राहण्याचे कारण विचारले, त्यांचे उत्तर ऐकून आम्हा मुलांना फार लाज वाटली. ते म्हणाले, ''मी एक सामान्य माणूस आहे, मला या उभे असणाऱ्या कोणालाही मत द्यायचे नाही तर विरोध करायचा आहे. मी स्वतः उभा राहीन व माझे एक मत स्वतःला देऊन त्यांचा विरोध नोंदवीन.'' हे ऐकून आम्ही स्वखुशीने त्यांच्या शिडी चिन्हाच्या भिंती रंगवल्या (तेव्हा ते चालत होते) व जमेल तसा प्रचार केला. त्यांना पंधरा-वीस मते मिळाली असतील, पण व्यवस्थेला विरोध करण्याचे पूर्ण समाधान मिळाले असेल. निवडणुकीस्य कथा रम्या.

**रवी वाघमारे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर

दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बंडखोरांचे भाजपामधून सहा वर्षांसाठी निलंबन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** पक्षशिस्तीचा भंग करून संघटनात्मक शिस्तीला बाधा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्याने पक्षातील १८ जणांना भाजपातून ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिली.

लातूर मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षशिस्त, धोरणे व निर्णय यांचे पालन होणे अपेक्षित होते.तथापि काहीजणांच्या कार्यपद्धतीमुळे पक्षाच्या शिस्तीला बाधा निर्माण झाली.या संदर्भात पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर या १८ जणांचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करून त्यांना पक्षातून ६ वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे कार्यकर्ते जी पदे भूषवित होते ती पदेही समाप्त केली जात असल्याचे पक्षाने जाहीर केले आहे.

पक्षहित व संघटनात्मक शिस्त लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आलेला असल्याचेही शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी या बाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे.



# लातुरात एका मताची किंमत दोन हजार रुपये?

## समाजमाध्यमांवरील चर्चेने मतदार संभ्रमात । लोकशाहीची क्रूर चेष्टा सुरू असल्याचा मतदारांचा आरोप

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** सध्यस्थितीत कोणतीही निवडणूक म्हटले की उमेदवारांकडून मतांसाठी मतदारांना सर्रास पैसे वाटप केले जात असल्याची चर्चा रंगते. याबाबत पैसे देणारा आणि घेणारा दोघांचीही 'चिडीचूप' असल्याने कोणावरही ठामपणे आरोप करता येत नाही. कारण यासंदर्भात कोणीही छातीठोकपणे बोलायला पुढे येत नाही. चालू असलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीतही एका मतांसाठी काही ठराविक राजकीय पक्षांची मंडळी चक्क दोन हजार रुपये देत असल्याची चर्चा समाजमाध्यमांवर सुरु झाली आहे. या चर्चेने मतदार संभ्रमात असून सुजाण मतदारांनी हा प्रकार लोकशाहीची क्रूर चेष्टा असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

सर्वसामान्य आणि सरळ मार्गाने चालणाऱ्या व्यक्तींना निवडणूक लढविणे आजमितीस अशक्य झाले असल्याचे बोलले जाते. आजघडीला कोणताही कार्यकर्ता इच्छुक उमेदवारांकडून काही ना काही अपेक्षा बाळगून चालताना दिसतो. तीन चार दशकापूर्वीच्या वातावरणातील नेते-कार्यकर्ते आणि आजचे नेते-कार्यकर्ते यांच्यात जमीन आस्मानाचा फरक आहे. त्यावेळी कार्यकर्ते नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून चालत असत. नेताही बोलल्याप्रमाणे चालण्याला प्राधान्य देत असे. आज ना नेते तत्वाप्रमाणे चालतात ना कार्यकर्ते. सध्यस्थितीत एकही नेता तत्व, प्रामाणिकपणाच्या गोष्टी करताना आढळून येत नाही. त्यावरून राजकारणाचा दर्जा किती खालावला आहे, याची पुसटशी कल्पना येते.

आजच्या निवडणुकीत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या आचारसंहितेच्या चौकटीत कोणताही उमेदवार वागताना दिसत नाही. याची कल्पना दस्तुरखुद्द निवडणूक आयोगालाही असते, नाही असे नाही. परंतु आयोगाच्या भीतीपोटी का होईना काही गोष्टी मर्यादेत राहून करतात, एवढेच काय ते समाधान. निवडणुकीसाठी आखून दिलेली



खर्चाची मर्यादा तर सर्रास ओलांडली जाते याची सगळ्यांनाच कल्पना आहे. साध्या ग्रामपंचायतच्या सरपंच पदाच्या निवडणुकीत एक एक कोटीपर्यंतचा खर्च करणारी मंडळी जिल्ह्याच्या राजकारणात आहेत. हा प्रकार केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात-देशातही चालताना दिसतो. पण त्याबाबतीत स्पष्टपणे बोलायला कोणीही पुढे येत नाही, हा भाग वेगळा. लातूर शहर मनपा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात येऊन पोहचला आहे. मंगळवारी सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. प्रचारादरम्यान आरोप प्रत्यारोपांची मोठ्या प्रमाणात देवाण - घेवाण झाल्याचे पाहायला मिळाले. या निवडणुकीत समाज माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण ठरल्याचे निदर्शनास आले. कोणतीही गोष्ट क्षणात समाजातील सर्वस्तरीय घटकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणूनही समाज माध्यमांकडे पाहिले जाते.

लातुरात मतदानासाठी दोन-दोन हजार रुपये देण्यात येत असल्याची चर्चा सोमवारी समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसली. काही प्रमुख राजकीय पक्षांच्या लोकांना अमुक प्रभागात पैसे वाटप करताना रंगेहाथ पकडले वगैरे चर्चा चालू असल्याचे पाहून मतदारांतही संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून आले. येत्या दोन दिवसात असे प्रकार घडल्याच्या चर्चा मोठ्या प्रमाणात कानावर आल्यास फारसे नवल वाटायला नको. कारण प्रत्येक राजकीय पक्ष यासाठी परस्परांवर कुरघोडी करण्याच्या नक्कीच प्रयत्नात असल्याचे दृष्टीपथास येत आहे. मतांसाठी पैसे देणारी मंडळी आणि मतदानासाठी त्यांच्याकडून पैसे घेणारे मतदार या दोघांच्याही या कृतीबद्दल सुजाण नागरीकातून सखेद आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आपले अमूल्य मत कोणीही, कोणत्याही उमेदवाराला, राजकीय पक्षाला विक्री करू नये असे आवाहन सुजाण मतदारांतून केले जात आहे. हा प्रकार लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून अशा घातक प्रवृत्तींना मतदारांनी वेळीच ठेचून काढावे, असे आवाहनही सुजाण मतदारांनी केले आहे.

## श्री गुरु तेगबहाद्दूर यांच्या कार्याचा शाळा, महाविद्यालयांमध्ये होणार जागर

लातूर, दि. १२ (जिमाका) : हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहाद्दूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम



वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक असलेल्या श्री गुरु तेग बहाद्दूर यांचा इतिहास शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविला जाणार आहे. यासाठी शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

श्री गुरु तेग बहाद्दूर यांचा गौरवशाली इतिहास, त्यांनी दिलेले

**३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष उपक्रम; शिक्षण विभागामार्फत घोषवाक्य, निबंध, वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन**

ले बलिदान आणि त्यांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी सर्व शाळांमध्ये त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखविला जाणार आहे. यासोबतच चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन करण्यात येणार आहे. तसेच नांदेड येथे होत असलेल्या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी प्रभात फेरीचे आयोजन केले जाणार आहे. याबाबत शिक्षण विभागामार्फत सर्व गट शिक्षणाधिकारी यांची बैठक घेवून सूचना देण्यात आल्या आहेत.

## क्षयरुग्णांना फूड बास्केट वाटप



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी लातूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गंगापूर व ग्रामपंचायत पाखरसांगवी यांच्या संयुक्त विद्यमाने उपचाराखालील १५ क्षय रुग्णांना फूड बास्केट वाटप करण्यात आले. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र गंगापूर येथील डॉ. महेश दिक्षीत वैद्यकीय अधिकारी, डॉ. वाघमोडे मॅडम, समुदाय आरोग्य अधिकारी, प्रशांत शेट, आरोग्य पर्यवेक्षक काळे, श्रीमती कांबळे, ग्रामपंचायत पाखरसांगवी सरपंच भीमाशंकर लखादिवे, उपसरपंच सारीकाताई हंडरगुळे, ग्रामविकास अधिकारी चोथवे, ग्रामपंचायत कर्मचारी, सर्व उपकेंद्रातील आशाताई, गटप्रवर्तक श्रीमती लताताई वाघमारे यानी परिश्रम घेतले.

## गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे सोयाबीनचोरी प्रकरण उघडकीस

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** लातूर पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे सोयाबीनची चोरी करणाऱ्या तिघांना शिताफीने पकडण्यात आले आहे. त्यांच्याकडून १ लाख ३८ हजार ४०० रुपयांचा वजही ताब्यात घेण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील शेतकरी हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या घामातून निर्माण होणारा शेतीमाल चोरीस जाणे ही केवळ आर्थिक हानी नसून त्यांच्या कष्टांवर झालेला अन्याय आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी लातूर पोलीस प्रशासन सदैव सज्ज आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी मालमत्ते विषयक घडणाऱ्या विशेषतः शेतकऱ्यासंदर्भात घडणाऱ्या प्रत्येक गुन्ह्याचा छडा लावणे संदर्भात पोलीस प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत त्या अनुषंगाने अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने रविवार, दि. ११ जानेवारी रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास, निलंगा पोलीस स्टेशन हद्दीतील पानचिंचोली पाटी परिसरात हणुमंतवाडी ते निलंगा जाणाऱ्या रोडवरील मसलगा शेत शिवारात, ४ ते ५ इसम चोरट्या पद्धतीने, संशयितरित्या सोयाबीनचे कट्टे पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनात भरत आहेत, ही माहिती मिळताच पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

पोलीस पथकाची चाहूल लागताच संशयित इसम पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र, पथकातील अधिकारी व अमलदारांनी प्रसंगावधान राखत पाठलाग करून तीन इसमांना ताब्यात घेतले. एक इसम मात्र पिकअप वाहन घेऊन पसार झाला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे दिपक तानाजी पवार, नवनाथ छगण उर्फ अचित काळे, संतोष सखाराम काळे अशी आहेत.

तपासादरम्यान आरोपींनी कबूल केले की, त्यांनी सुमारे १५ दिवसांपूर्वी खरोसा जवळील शिंदी जवळगा गावातील शेतशिवारातून रात्रीच्या वेळी एकूण ४० कट्टे सोयाबीनची चोरी केली होती. या कारवाईत एकूण १ लाख ३८ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये चोरीचे सोयाबीनचे कट्टे तसेच गुन्ह्यात वापरलेली एम.एच. २५ ए.व्ही. ४४२७ क्रमांकाची हिरो कंपनीची काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटारसायकल यांचा समावेश आहे. सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, पोउपनि राजेश घाडगे, पोलीस अंमलदार नवनाथ हासबे, माधव बिलापटटे, राजेश कंचे, तुराब पठाण, प्रशांत स्वामी, संजय कांबळे, सुर्यकांत कलमे, प्रदीप स्वामी, तुळशीराम बरूरे, पाराजी पुट्ठेवाड, गणेश साठे, गोविंद भोसले, अंजली गायकवाड, शैलेश सुडे, हरी पतंगे, श्रीनिवास जांभळे यांचा समावेश होता.

## लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान आपले कर्तव्य : उपायुक्त खानसोळे



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** देशाच्या उज्वल भवितव्यासाठी व लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, समाजकार्य व क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित मतदान जनजागृती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत ते होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे हे होते तर विचारमंचावर शिक्षणाधिकारी श्वेता नागणे, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, जिल्हा समन्वयक सतीश भापकर, स्वीप सदस्य पवनकुमार खोत, महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. संजय गवई, डॉ. यशवंत वळवी, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. मारोती माळी आणि नामदेव बेंदरगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर, राष्ट्रमाता माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना उपायुक्त पंजाबराव खानसोळे म्हणाले की, सार्वत्रिक निवडणुका ह्या लोकशाहीचा उत्सव असतात. या उत्सवात सर्व सुजान दक्ष नागरिकांनी सहभागी झाले पाहिजे. मतदान हा मतदाराचा संवैधानिक हक्क असून ते आपले कर्तव्य देखील आहेत. तरुणांनी नि:पक्षपातीपणे मतदान केले पाहिजे आणि परिसरातील सर्वांना मतदान करण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. शंभर टक्के मतदान झाल्यास आपल्या नेतृत्वास आपण प्रश्न विचारू शकतो आणि त्यामुळे आपल्या समस्या निवारण होऊ शकतात असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. यावेळी अजय राऊत आणि यश आरेकर यांनी मतदान जनजागृतीवर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गवई यांनी केले, सूत्रसंचालन किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले.

## 'केशवराज'मध्ये जिजाऊ, विवेकानंद जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. १२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ, युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी व वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अतिशय उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, विशेष उपस्थिती माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुरलीधर गवळी, विद्यालयाचे मुख्यध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख बाळासाहेब करपुडे तसेच राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत विद्यार्थिनी स्वरा आचार्य(आठवी अ), स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत सार्थक राऊत (आठवी फ) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे मुरलीधर गवळी यांनी स्वामी विवेकानंद हे करोडो भारतीय



युवकांचे प्रेरणास्थान आहेत असे सांगून त्यांच्या बालपणीच्या प्रसंगाचे कथन केले. याप्रसंगी त्यांनी स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला तसेच 'मानव सेवा हीच ईश्र्वर सेवा' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापन झालेल्या रामकृष्ण मिशनची माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात धनंजय तुंगीकर यांनी थोर महापुरुषांच्या चरित्रांचे वाचन करावे, त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्यातील एकतरी गुण अंगीकारावा. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे सादरीकरण वर्गात करावे, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

याप्रसंगी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त लोकसेवा समिती, धाराशिव यांच्यावतीने लातूरच्या मातोश्री वृद्धाश्रमास मराठवाडा स्तरीय निरपेक्ष सेवेचा लोकसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल मातोश्री वृद्धाश्रमाचे कार्यवाह तथा माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर यांचा सत्कार करण्यात आला तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मीडटाउनच्या वतीने देण्यात येणारा 'राष्ट्र निर्माता पुरस्कार' विद्यालयाचे पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी यांना प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत उपस्थित विद्यार्थिनी स्वरा आचार्य हिने तसेच स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेतील सार्थक राऊत या विद्यार्थ्यांनी स्वगत सादर केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत सुलक्षणा गंगथडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रज्ञा नाईक यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कलोपासक मंडळाच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका गिरी, शैला सांगवीकर, शैलजा देशमुख, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १२ जानेवारी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात तत्वज्ञान विभाग आणि मराठी विभाग यांच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरुळे, प्रो. डॉ. संजय गवई, डॉ. गीता गिरवलकर, डॉ. भाग्यश्री दाणे, प्रा. अलका चिखुर्डेकर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. पी. एन. सराफे, प्रा. डी. व्ही. फड, प्रा. सिद्धेश्वर घोडके, प्रा. दयानंद बोयने, प्रा. ज्ञानेश्वर ठाकूर, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांची उपस्थित होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले, प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे, यांनी तर आभार डॉ. शितल येरूळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि रंगनाथ लांडगे यांनी सहकार्य केले.

# चित्रकला परीक्षेत शास्त्री विद्यालयाचे २८ विद्यार्थी चमकले

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १२ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा चित्रकलेचा निकाल जाहीर. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई आयोजित शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ या चित्रकलेच्या परीक्षेत लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, उदगीर येथील १५८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या परीक्षेच्या परीक्षा केंद्रावर सर्वाधिक संख्येने हा विद्यालयाचा सहभाग राहिला होता. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेतील इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा यात इयत्ता आठवी ते दहावी मधील ६२ विद्यार्थी सहभागी झाले होते यातील २५ विद्यार्थी ए श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.तर 'बी' श्रेणी



घेऊन २८ विद्यार्थी तर सी श्रेणी घेऊन ०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत सदरील परीक्षेचा निकाल ९६.८७ % लागला आहे. याशिवाय इयत्ता सातवी ते नववी वर्गातील ९३ विद्यार्थी एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत सहभागी झाले होते. या परीक्षेत ए श्रेणी घेऊन ३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. तर बी श्रेणी घेऊन ०९ विद्यार्थी व सी श्रेणी घेऊन ८१विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. याही परीक्षेचा १०० % निकाल लागला आहे. या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासुणे, शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले तसेच सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक कलाशिक्षकाचे अभिनंदन केले.



# आ. पवार यांच्या हस्ते ग्रामसंसद भवनाचे लोकार्पण

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १२ जानेवारी :** विकासनिधी देताना कोणताही भेदभाव केला नाही. तर आपलेच गाव समजून प्रत्येक गावाला मुबलक विकासनिधी उपवब्ध करुन दिल्याने विकासकामे मार्गी लागली आहेत. गेल्या पन्नास वर्षाच्या तुलनेत या पंचवार्षिकमध्ये सर्वाधिक निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

औसा तालुक्यातील हिप्परगा येथे नरेगा व जनसुविधा आभिसरण योजने अंतर्गत उभारण्यात आलेल्या ग्रामसंसद भवनाचे लोकार्पण आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच संतोष गोरे, उपसरपंच ड. नितीन म्हेत्रे, ग्रामविकास अधिकारी धनंजय बनकर, सुभाष जाधव, काकासाहेब मोरे, व्यंकट पाटील, धनंजय भोसले, विस्तार अधिकारी बी. पी. तेलंग,के.डी. पवार, उपअभियंता जी. एस. सुर्यवंशी, शाखा अभियंता के. एस. म्हेत्रे, तांत्रिक सहाय्यक व्ही. एस. काळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विष्णु कोळी, जयशंकर विभुते, अर्जुन घाडगे, गोविंद कोराळे, प्रमोद भोजने किशोर काटे, विलास कोळी ,राजेंद्र म्हेत्रे, व्यंकटराव पाटील उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, शासकीय योजनांच्या माध्यमातून गावांच्या विकासासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्याचा आपला ठाम संकल्प आहे. या संकल्पातून या गावात ग्रामसंसद भवन ४०, नरसिंह मंदिर सभागृहाचे सभागृह १०, सावतामाळी सभागृह १५, पेवर ब्लॉक रस्ता २० अशा ८५ लाख रुपयांची कामे करुन लोकार्पण करण्यात आले.आसे मत व्यक्त केले.या नव्याने उभारण्यात आलेल्या ग्रामसंसद भवनामुळे गावाच्या प्रशासकीय कामकाजाला गती मिळणार असून ग्रामविकासाच्या दृष्टीने हे भवन मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास आ. पवार यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवलिंगेश्वर फार्मसीत पदवीधरांचा दिक्षांत समारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १ जानेवारी :** तालक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात एम. फार्मसी, फार्म. डी., फार्म. डी. आणि बी. फार्मसी या अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित भव्य दीक्षांत समारंभात पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. हा सोहळा केवळ शैक्षणिक यशाचा उत्सवच ठरला नाही तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक प्रेरणादायी प्रसंग ठरला आहे.

आलमला गावचे सुपुत्र तथा उपजिल्हाधिकारी, विशेष भुसंपादन अधिकारी प्रताप गोरख वाघमारे, प्रा. डॉ. एस. जी. गट्टानी, वरीष्ठ प्राध्यापक, स्कूल ऑफ फार्मसी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे वरिष्ठ प्रा. डा. एस. जी. गट्टानी, नांदेड फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. डा. नितीन बी. घीवारे, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

प्रताप गोरख वाघमारे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले, फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी संशोधनाद्वारे देशाचा विकास साधावा. तुमच्या जीवनातून लोकांना प्रेरणा मिळेल असे कार्य करा. तुमची ऊर्जा समाजासाठी सकारात्मक आणि फायदेशीर कार्यांसाठी वाहा. हे केवळ तुमचे वैयक्तिक यश नसून, समाजाच्या प्रगतीचे साधन ठरेल, त्यांच्या या शब्दांनी उपस्थित सर्वांमध्ये उत्साह संचार झाला.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ. समीर शफी, डॉ. सुरज मालपानी, डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे आणि परीक्षा विभाग प्रमुख प्रा. सय्यद अब्दुल अजीम हे उपस्थित होते.

डॉ. एस. जी. गट्टानी म्हणाले, विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून करिअर घडवावे तसेच विद्यार्थ्यांनी आजच्या पिढीतील आव्हाण ओळखुन फार्मसी क्षेत्रात डिजिटल टूल्सचा वापर करून नवीन संधी शोधावी असे मत व्यक्त केले.

डॉ. नितीन घीवारे म्हणाले, फार्मसीच्या माध्यमातून सौंदर्यप्रसाधन उत्पादन व्यवसायात विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. इंडस्ट्री ट्रेंड्सचा अभ्यास करुन नवीन उत्पादने विकसित करावे असे आवाहन करुन विद्यार्थ्यांना व्यावहारिक मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. पदवीधर व माजी विद्यार्थ्यांनी जीवनातील हा शैक्षणिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आनंद यावेळी जल्लोषात साजरा केला. व्यासपीठावर पदवी प्रदान होत असताना शिक्षक, कुटुंबीय, मित्रपरिवार यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत होता. हा विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ प्रत्येक पदवीधराच्या जीवनातील संस्मरणीय क्षण ठरला. माजी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि समाधानाची लहर उसळली, तर संस्थेच्या वतीने सर्वांना अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ. सुरज मालपानी यांनी सुत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी

# बसवनवाडीत भागवत कथेचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १२ जानेवारी :** भालकी तालुक्यातील सायगाव सर्कल मधील बसवनवाडी येथील ग्रामदैवत हनुमान मंदिर परिसरामध्ये ९ जानेवारी ते १६ जानेवारी २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ठीक ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत भागवत कथा प्रवक्ते ह भ प गणेशानंद शास्त्री महाराज यांचे भव्य भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

बिदर जिल्ह्याचे लोकप्रिय खा. सागर ईश्वर खंडरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी या भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन स्वदेशी रनने साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १२ जानेवारी :** छत्रपती शिवाजी महाविद्यालयात




क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन १२ जानेवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जयंती निमित्ताने रण फॉर स्वदेशीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी सकाळी ७.३० वाजता हिरवा झेंडा दाखवल्यानंतर स्वदेशी रनला सुरुवात झाली.

या स्वदेशी रनचा मार्ग शिवाजी महाविद्यालय उदगीर मुख्य व्दारापासून सुरु होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, कॅप्टन कृष्णाकांत चौक जळकोट रोड मार्गे शिवाजी महाविद्यालय असा २ कि. मी. मार्गक्रमाने नियोजित करण्यात आला होता. सदर उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विविध विद्याशाखेचे विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उस्फूर्तपणे सहभागी झाले. सदरील कार्यक्रमाला उदगीर शहर पोलीस तसेच उपजिल्हा रुगणालय उदगीरच्या वैद्यकीय पथकाचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नेहाल खान यांनी केले.

# लालबहादूर शास्त्री विद्यालयात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १२ जानेवारी :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष किरण नेमट विनायक इंगळे प्रमुख पाहुणे बबन गायकवाड आशा मोरे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे सहप्रमुख निलेश मांडवकर कलोपासक मंडळ प्रमुख प्रीती शेंडे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते बबन गायकवाड यांनी आपल्या वक्तव्यातून शिवरायांना घडवण्यामध्ये जिजाऊ मातेचा सिंहाचा वाटा होता. राजमाता जिजाऊ यांनी कर्मातून राष्ट्र घडवले तर स्वामी विवेकानंदांनी विचारातून राष्ट्र जागे केले तसेच रामकृष्ण मिशनची स्थापना रामकृष्ण मिशनचे कार्य व कर्मयोग याविषयीची माहिती सांगितली.तर आशा मोरे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समारोपामध्ये किरण नेमट यांनी आजच्या पिढीने जिजाऊकडून धैर्य, स्वाभिमान, स्त्री सन्मान, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद घ्यायची तसेच विवेकानंदांची राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा याविषयीचे विचार व्यक्त केले सूत्रसंचालन ओंकार इंगळे व निलेश केंद्रे तर प्रास्ताविक प्रीती शेंडे गीत अनुष्का उदगिरे व आभार श्रीनिवास चिट्टे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी कार्यक्रम प्रमुख पंकज देशमुख संदिप पाटील व व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# माजी जि.प. सदस्य ईश्वर गुडे यांच्यासह कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**
**पानगाव, १२ जानेवारी :** काँग्रेस पक्षाच्या सर्वसमावेशक विचारधारेला आणि विकासाभिमुख धोरणांना समर्थन देत भारतीय जनता पक्षाचे पानगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य ईश्वर गुडे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे परिसरातील राजकीय वातावरणात मोठी हालचाल निर्माण झाली असून काँग्रेस पक्षाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे.

या प्रवेशप्रसंगी माजी आमदार धिरज देशमुख यांनी सर्व नवप्रवेशित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे काँग्रेस परिवारात मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, काँग्रेस हा सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारा पक्ष असून नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवाचा आणि



ताकदीचा पक्षाला निश्चितच फायदा होईल. पुढील राजकीय वाटचालीसाठी त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

विशेषतः पानगाव जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे काँग्रेस पक्षाला ग्रामीण भागात अधिक बळ मिळाले आहे. स्थानिक पातळीवर संघटन मजबूत होऊन आगामी निवडणुकांमध्ये याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला काँग्रेसचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच हा प्रवेश काँग्रेस पक्षासाठी उत्साहवर्धक ठरला असून आगामी काळात पक्षसंघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# बसवनवाडी शाळेमध्ये एफएलएन कलिका हब्बा सण

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १२ जानेवारी :** भालकी तालुक्यातील सायगाव क्लस्टर मधील येणाऱ्या बसवनवाडी सायगाव पांढरी, केसरजवळगा, सायगाव तांडा, पांढरी तांडा येथील सरकारी उच्च प्राथमिक शाळेमध्ये ८ जानेवारी रोजी गुरुवारी २०२६,२७ या वर्षातील एफ एल एन कलिका हब्बा हा शैक्षणिक सण बसवनवाडी येथे पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्याकडून वाचन उपक्रम कथाकथन सुंदर हस्तक्षर प्रश्नमंजुषा पालक सहभाग विद्यार्थ्यांनी सात उपकरणांमध्ये भाग घेऊन हा कलिका हब्बा शैक्षणिक सण मोठ्या उत्साहात सायगाव बसवनवाडी तांडा येथील शाळेच्या विद्यार्थ्यांच्यावतीने बसवंतवाडी येथील सरकारी उच्च प्राथमिक शाळेमध्ये साजरा करण्यात आला.

या कलिका हब्बा शैक्षणिक सणाचे कार्यक्रमाचे उद्घाटन भालकी तालुक्याचे बीआरसी राजकुमार जोळदापके यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक उल्हास कांबळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बीआरपी संजीव कुमार सावरे, महेंद्र कुमार मानकरी, संतोष मुदाळे



इसीओ अर्जुनराव कांबळे, सीआरपी समीर शेख, जालिंदर जेदे, सत्यवान कांबळे, माधव सूर्यवंशी, अशोक स्वामी, एसडीएमसीचे अध्यक्ष अंबादास मेहत्रे, उपाध्यक्ष ज्योती पवार, संजू दलसिंगे, धर्मेंद्र भोसले, मारुती केंद्रे, माजी टीपी सदस्य विठ्ठलराव पाटील, शेषराव पाटील, माधव तांबरवाडे, सुधाकर गायकवाड, व्यंकटराव, जे टेपा वालीकर, तानाजी, विठ्ठलराव मुगळे, राजकुमार माने, बसवराज बिरादार, बसवराज बेलोरे, पांडुरंग धुर्वे, शमा शेख मॅडम, शितल मॅडम, विजयालक्ष्मी ताई, कविता खरगे, भाग्यश्री जाधव या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

शाळेच्या वतीने या प्रमुख मान्यवरांना पुष्पगुच्छ पेन देऊन सात्विक सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील मुख्य मार्गाने शाळेचे विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा सादर करून कलिका शैक्षणिक सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका विद्यार्थी विद्यार्थिनी एसडीएमसीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य य तथा शिक्षणप्रेमी व गावातील सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी मुख्य स्वयंपाकी सहाय्यकी पालक माता बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक राजकुमार माने यांनी मानले.

# तुगाव यात्रा महोत्सवास उद्यापासून प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १२ जानेवारी :** कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगना या तीन राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या ग्रामदैवत श्री.महालक्ष्मी मातेच्या यात्रा (कायरं) महोत्सवास येत्या १४ जानेवारी २०२६ पासून प्रारंभ होणार असून नवसाला पावणारी देवी म्हणून श्री. महालक्ष्मी मातेची ख्याती आहे.

या सहा दिवसांच्या यात्रा महोत्सवामधील दैनंदिन कार्यक्रम म्हणून १४ जानेवारी-हिरडे बसवीने, १५ जानेवारी -श्रींची मंडप पूजा, १६ जानेवारी -सांस्कृतीक कार्यक्रम, १७ जानेवारी-श्री.महालक्ष्मी मातेची स्वग्रहाकडून मंदिराकडे पालखी



मिरवणूक, १८ जानेवारी- श्रींची महापूजा व महानैवद्य, १९ जानेवारी- कोंडा लुटणे व श्री.महालक्ष्मी मातेची मंदिराकडून स्वग्रहाकडे पालखी मिरवणूक तसेच यात्रा महोत्सवाची सांगता होणार असून या व्यतिरिक्त या यात्रा महोत्सवामध्ये पोतराजाचा कार्यक्रम, आराधी, भारुडे अशा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रा महोत्सवात लाखोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी येतात. या यात्रा महोत्सवाची शोभा वाढवावी असे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजकुमार पाटील सह सर्व सदस्यांतर्फे करण्यात आले आहे.

# माचरटवाडी हरिनाम सप्ताहास आजपासून प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, १२ जानेवारी :** शिरूर अनंतपाळ येथुन जवळच असलेल्या मौजे माचरटवाडी येथे भगवान पांडुरंग रुक्मिणी मातेच्या कृपा आशिर्वादाने तसेच सद्गुरू गुरूबाबा महाराज औसेकर, सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर, सद्गुरु महंत महादेवपुरी बाबा महाराज महंत शिवरामदास गुरु नारायण दास महाराज बाकली, ह.भ.प. विरनाथ महाराज लड्डा निटूरकर यांच्या कृपाशीर्वादाने तसेच महर्षी संदीपनी गुरुकुल आश्रम सिद्धबेट आळंदी व सोपान काका महाराज यांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व शिवपुराण कथा दि.१२ जानेवारी २०२६ रोजी प्रारंभ होत आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाचे १४ वे वर्ष असून कथा प्रवक्ते ह.भ.प.सतीशजी महाराज





लातूरकर, आळंदी देवाची व्यासपीठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प वीरनाथ महाराज लड्डा निटूर, ह.भ.प राजेश महाराज पाटील गुंजरगा, ह.भ.प गोरखनाथ महाराज लड्डा लातूर. ह.भ.प बन गुरुजी सेंद, ह.भ.प किशोर महाराज शिवनीकर, ह.भ.प धनराज महाराज मोहिते डोंगरगावकर , ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली महाराज कदम (छोटे माऊली) आळंदी देवाची काल्याचे कीर्तन ह.भ.प.महंत गुरुवर्य बाबा महाराज भाटेपुरीकर पंचमुकेश्वर संस्थान तळा भाटेपुरी, ह.भ.प सतीशजी महाराज लातूरकर, आळंदी देवाची, माजी विद्यार्थी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था यांच्या कीर्तनसेवेचा आनंद घेता येणार आहे. काल्याच्या कीर्तनानंतर गावकऱ्यांतर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे माचरटवाडी येथील ग्रामस्थांनी आवाहन केला आहे.

# भवानी बिजलगाव येथे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १२ जानेवारी :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

सीमावर्ती भागातील कमलनगर तालुक्यातील भवानी बिजलगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही प्रभू यल्लालिंग मुत्या महाराज यांच्या ४० वा पुण्यतिथी सोहळा व तपस्वी लिगैक्य दत्तात्रय महाराज यांच्या तिसऱ्या पुण्यतीथी सोहळ्यानिमित्त १४ जानेवारी व १५ जानेवारी रोजी दोन दिवशीय धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१४ जानेवारी रोजी व



भवानी मंदीर बिजलगाव ते प्रभू यल्लालिंग मुत्या महाराज मठ देवस्थान पर्यंत पालखी मिरवणूक निघणार आहे. रात्री हभप. निवृत्ती महाराज हल्लाळीकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले. दि. १५ जानेवारी रोजी सकाळी यल्लालिंग मुत्या महाराज यांचा महाअभिषेक सोहळा संपन्न होऊन दुपारी विविध मठाच्या साधुसंताचे आशिवचन होणार आहे. त्यानंतर हभप. संजय महाराज हिवराळे आळंदी देवाची यांचे गुलालाचे किर्तन संपन्न होणार आहे, या सोहळ्यानिमित्त शिवलिंग शिवाचार्य महाराज मठ हेडगापूर, डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज हवागीस्वामी मठ डोणगाव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या दोन दिवशीय धार्मिक कार्यक्रमानिमित्त उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय उदगीर, मातोश्री नेत्र तपासणी केंद्र उदगीर व यल्लालिंग मुत्या महाराज मठाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन पिराजी महाराज भवानी बिजलगावकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पैशाची बॅग घेवून फरार झालेले आरोपी आंध्र प्रदेशातून जेरबंद

## २० लाखांचा मुद्देमाल जप्त, स्थागुशा, कुरूंदा पोलिसांची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

वसमत येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेतून ८ लाख रूपये घेवून बँक व्यवस्थापक ज्ञानोबा बालाजी भोसले हे वसमतहून चोंडी येथे जात असतांना कोर्टा फाटा जवळ दिवसाढवळ्या एका पिकअपने त्यांना जोरदार धडक दिली. त्यामुळे भोसले रस्त्याच्या बाजूला जखमी अवस्थेत पडले असता पाठीमागून आलेल्या दरोडेखोरांनी त्यांची पैसे असलेली बॅग जबरीने पळविली. याप्रकरणी कुरूंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि कुरूंदा पोलिसांनी केला असून याप्रकरणी दरोडेखोरांना जेरबंद करीत त्यांच्याकडून २० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे अशी माहीती पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, दि ९ जानेवारी रोजी चोंडी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक हे वसमत जिल्हामध्यवर्ती बँकेतून ८ लाख रूपये रोकड घेवून नेहमीप्रमाणे चोंडीकडे निघाले असता कोर्टा फाटाजवळ एका पिकअपने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते जखमी झाल्यानंतर पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दरोडेखोरांनी त्यांच्या हातातील ८ लाख रूपयांची रोकड असलेली बॅग हिसकावून पळ काढला होता. घटनेची माहीती मिळताच कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आजुबाजूच्या पोलिस ठाण्यांना तसेच गावकऱ्यांना माहीती दिल्यानंतर दोन जणांना संशयावरून ताब्यात घेण्यात आले होते. याप्रकरणी कुरूंदा पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.




या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्याकडे सोपवला. सपोनि शिवसांब घेवारे व सपोनि रामदास निरदोडे यांच्या पथकाने गोपनीय माहीतीच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषण करून जबरी चोरी करणारे व फिर्यादीची टिप देणारे ३ आरोपीस अटक केले होते. परंतु उर्वरित ६ आरोपी पैशाची बॅग घेवून फरार झाले होते.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने तांत्रिक विश्लेषण करून व गोपनीय माहीतीच्या आधारे उर्वरित ६ दरोडेखोर हे तिरूपती येथे जात असून ते सध्या आंध्रप्रदेश राज्यात बापटला शहरात आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे व उपनि गंधकवाड यांचे पथक तत्काळ आंध्रप्रदेशात रवाना होवून बापटला रेल्वे स्टेशन परिसरात छापा मारून ६ आरोपी व रोख ६ लाख ७० हजार रूपये ताब्यात घेतले. आजपर्यंत सदर गुन्ह्यात एकूण ९ आरोपी निष्पन्न झाले असून त्यामध्ये बालाजी उर्फ ठाकूर किशनराव पानधोंडे रा पळसगाव, नागनाथ विठ्ठल खराटे रा भोगाव, ओमकार भोजाजी गव्हाणे रा भोगाव, बालाजी बबन डाखोरे रा पळसगाव, महेंद्र आंबादास कांबळे रा भोगाव, ओमकार मोतीराम कदम रा भोगाव, ऋषी उर्फ सत्यम इंगोले रा पळसगाव, नागेश अच्यूत गाढवे रा भोगाव, भागवत शिवाजी कदम रा एकुर्गा यांचा समावेश आहे. पोलिसांनी चोरलेली रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेले वाहने असा एकूण २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक नीलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, सपोनि रामदास निरदोडे, उपनि पंढरी गंधकवाड, उपनि उमेश कारामुंगे, अंमलदार गजानन पोकळे, भुजंग कोकरे, भगीरथ सवंडकर, संदीप टाक, साईनाथ कंठे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, चालक सोनवणे, गजानन भालेराव, नामदेव कोटकर, वसमतकर, रवी मिनजगी, साठे, इरफान पठाण, दत्ता नागरे, मारोती काकडे, प्रदीप झुंगरे, प्रणिता मोरे यांनी केली असून पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# हिंगोलीत राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

येथे राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्सव थाटात संपन्न झाला. या निमित्त मॉसाहेबांना अभिवादन करण्यात आले. या वेळी आमदार तानाजी मुटकुळे, माजी आमदार भाऊराव पाटील, नगरसेवक श्रीराम बांगर, पो. नि. संदीप मोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंगोली येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समितीच्या वतीने

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉ साहेब व स्वामी विवेकानंद जन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन दि. १२ जानेवारी सोमवार रोजी सकाळी पुतळा परिसरामध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनाने करण्यात आली. याप्रसंगी मॉ जिजाऊंच्या कार्याबद्दल हनुमान जाधव, कलानंद जाधव, समरीन शेख, प्रीती पंडित, गुठ्ठे यांनी विचार व्यक्त केले. पुतळा समिती सचिव त्र्यंबकराव लोंढे,ॲड रमेश शिंदे, शिव जयंती अध्यक्ष उल्हास पाटील, पत्रकार प्रकाश इंगोले, भगवान काळे,राम कदम, प्रा रमेश दळवी, मुख्याध्यापक डॉ. प्रकाश आंभोरे, पी आर हेंबाडे, बाबुराव शृंगारे, प्रा.विश्वकांत विटकर,बाजीराव इंगोले, सुरेश जयस्वाल, जिजाऊ ब्रिगेडच्या स्मिता दळवी, सुरेखा इंगोले, कल्पना सोळंके, कांताबाई कल्याणकर, सुनिता भालेराव, छाया मगर,जागृती गोरे, जया शिरसाठ, सोळंके ताई, उमेश्वरी वाजपेयी अदिची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक त्र्यंबक लोंढे यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन माजी उपप्राचार्य सुधाकर इंगोले यांनी केले. शेवटी आभार डॉ.रमेश शिंदे यांनी मानले कार्यक्रमास मोठ्या संख्येने जिजाऊ प्रेमी,जिजांऊच्या लेकी महिला भगिनी उपस्थित होत्या. यावेळी मिठाईचे वाटप करण्यात आले.



**हिंगोली– शिवतीर्थ मातृत्व सिंदखेडराजा येथपर्यंत भव्य वारकरी पायी दिंडी रवाना होण्यापूर्वी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास वारकरी संप्रदायाकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील महिला व पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



औंढा नागनाथ– तालुक्यातील शिरड शहापूर ग्रामपंचायत येथे आज दि १२/१/ २०२६,वार– सोमवार रोजी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती कार्यक्रम घेण्यात आला. सदरील कार्यक्रमांमध्ये, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागअंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे चे ॲड. सुकेश कांबळे, सिद्धार्थ गोंवदे, प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला.सदरील कार्यक्रमांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत शिरडशहापूर चे सरपंच यशवंत रावले यांनी केले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य गुलाब नबी शेख, प्रवेज शेख, गजानन अंतेवार, गंगाप्रसाद लांडगे, रामजी लुटे, शरद बिच्चेवार, प्रदीप परळीकर, आहेमद पठाण पत्रकार आदींची उपस्थिती होती.

### हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात जयंती साजरी



हिंगोली– येथील हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात दि १२ जानेवारी रोजी राष्ट्रामाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांनी जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ग्रामीण पोलिस ठाण्यातील सर्व पोलिस कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### सात वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून १३५० रूपयांचा दंड वसुल केला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत १ ठिकाणी पोलिसांनी छापा मारून अवैध दारू जप्त केली तर जिल्ह्यात तीन ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा मारून मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हे दाखल केले आहेत

# सेनगाव तालुक्यात अवैध वृक्षतोडीकडे वनविभागाचे दुर्लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

सेनगाव तालुक्यातील वन विभागाच्या जंगलातून रिसोड, परभणी आणि जिंतुर येथील टोळी येऊन वृक्षतोड करीत आहेत. या भागातील जंगले झपाट्याने कमी होत असून वन विभागाचे अधिकारी आणि पथक मात्र वाढदिवस साजरा करण्यात व्यस्त असल्याचे दिसत आहेत. सेनगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वन विभागाची जमीन असून या जमिनीवर नैसर्गिक जंगले आहेत. परंतु मागील काही महिन्यांपासून या भागातील मौल्यवान झाडे लोप होत असून मोठमोठी वृक्षांची कत्तल होत असल्यामुळे ही जंगले आता उजाड दिसत आहेत. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. केवळ पावसाळ्यात झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम फोटोसेशन करण्यापूरती असते परंतु त्यानंतर या जंगलामध्ये परभणी, जिंतुर आणि रिसोड याभागातील मोठी टोळी वृक्षांची कत्तल करण्यामध्ये सक्रिय झाल्याचे दिसत आहे. परंतु वन विभागाचे अधिकारी, पथके याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे हळूहळू ही जंगले नष्ट होत असतांना दिसत आहेत. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची तसेच नैसर्गिक जंगले जपण्याची आवश्यकता असल्याचे निसर्गप्रेमीमधूल मत व्यक्त केले जात आहे.

# शहरालगत ३ लाखांच्या गुटख्यासह ७.९० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

शहरालगत औंढा रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका वाहनातून ३ लाख रूपये किंमतीच्या गुटख्यासह ७.९० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकाला ताब्यात घेण्यात आले असून अन्य एकाचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ मार्गावरून एका कारमध्ये गुटख्याचे पोते आणले जात असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मोहन भोसले, जमादार शेख जावेद, महादू शिंदे, किशोर सावंत, सतीष जाधव यांचय पथकाने रविवारी रात्री अकरा वाजल्यापासून औंढा नागनाथ मार्गावर वाहनांची तपासणी सुरू केली होती. दरम्यान, रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास एक कार आल्यानंतर पोलिसांनी कार चालकाला थांबवून चौकशी सुरू केली. मात्र कार चालकाला समाजधानकारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे संशयावरून पोलिसांनी कारची तपासणी केली असता कारमध्ये खाकी रंगाच्या सहा पोत्यामध्ये केसरयुक्त विमल पान मसाला तसेच दुसऱ्या सहा पोत्यांमध्ये व्ही एक तंबाखूचे पुडे असा सुमारे ३ लाखांचा गुटखा आढळून आला.

पोलिसांनी गुटख्याची पोती व कार असा एकूण ७.९० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी जमादार महादू शिंदे यांच्या तक्रारीवरून मोहम्मद नदीम रा देगलूर नाका, नांदेड, शेख सिकंदर शेख मुजीब रा महादेववाडी हिंगोली यांच्याविरूध्द सोमवारी पहाटे गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मोहम्मद नदीम यास ताब्यात घेतले असून शेख सिकंदर याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. सदरची कारवाई पोलिस उपनिरीक्षक राहुल महिपाळे, जमादार अशोक धामणे, संजय मार्के, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, शंकर ठोंबर यांच्या पथकाने केली आहे. सध्या जिल्ह्यात पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांनी अवैध धंद्याविरोधात जोरदार मोहीम उघडली असून या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रंगोत्सव सेलिब्रेशन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दराडे विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली या शाळेचे विद्यार्थी रंगोत्सव सेलिब्रेशन इंटरनॅशनल कॉम्पिटिशन मध्ये चमकले आहेत. शाळेतील एकूण २८० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. त्यापैकी दिव्या भिसे वर्ग ७ वी हिने आर्ट मिरीट अवॉर्ड जिंकलेला आहे ;त्याबद्दल तिला ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच वेदांत रमेश वाबळे वर्ग १० वी याने हॅन्ड रायटिंग कॉम्पिटिशन मध्ये फाईव्ह स्टार ब्रिलियंट अवॉर्ड मिळविला; त्याबद्दल त्याला स्केच बुक अँड ग्राफाईट पेन्सिल व सिल्वर मेडल देऊन गौरविण्यात आले. समृद्धी नर्सिंग बासटवार वर्ग ८ वी अ कार्टून मेकिंग कॉम्पिटिशन मध्ये आर्ट मिरीट अवॉर्ड जिंकला तिला ट्रॉफी गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. एकूण ३२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल प्राप्त केले, ३८ विद्यार्थ्यांनी सिल्वर मेडल व १३ विद्यार्थ्यांनी ब्रांझ मेडल प्राप्त केले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे, उप मुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे यांनी केला. तसेच मार्गदर्शक कलाध्यापक रविंद्र जांभळे, त्यांना सहकार्य करणारे अध्यापक शिवाजी वडकुते व प्रवीण राऊत यांचाही ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धेत बसण्यास प्रोत्साहित केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे यांचाही ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे व शाळेच्या मुख्याध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक व सर्व संचालकांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे,मुख्याध्यापकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आदर्शमध्ये जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जानेवारी**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माँ साहेब जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माँ साहेब जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बोलतांना आघाव यांनी मातोश्री राजमाता जिजाऊ यांच्या कार्याबद्दल माहीती दिली. तसेच स्वामी विवेकांनद यांच्या स्वामी विवेकानंद हे १८ व्या शतकातील आध्यात्मिक नेते, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. ते एक विपुल विचारवंत, उत्तम वक्ते आणि उत्कट देशभक्त होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. संजिवकुमार नरवाडे, उपप्राचार्य (क.) प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, सहसचिव प्रा. वसंत पडोळे, कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

# जिल्हाधिकाऱ्यांची अवैध उत्खननावर धडक कारवाई

## ३ कोटी ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जानेवारी-**

लोहा तालुक्यातील मौजे येळी येथील नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी धडक कारवाई करत ३ कोटी ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रविवार ११ जानेवारी रोजी लोहा तालुक्यातील मौजे येळी येथे नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याची गोपनीय माहिती जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी रात्री सुमारे १०.३० वाजता प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



या वेळी नदीपात्रात अवैध उत्खनन सुरू असताना ३ हायवा ट्रक, ७ जेसीबी, १ मोठी फायबर बोट व ४ तराफे आढळून आले. तत्काळ स्थानिक पोलीस प्रशासन व तहसीलदार यांना घटनास्थळी बोलावून अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे सर्व साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत ४५ ब्रास वाळूचा साठा देखील जप्त करण्यात आला असून, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ३ कोटी ३२ लाख रुपये इतकी आहे.

जप्त केलेला सर्व मुद्देमाल तहसील कार्यालय, लोहा येथे जमा करण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यावर दंडात्मक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

या कारवाईमुळे नांदेड जिल्ह्यातील अवैध उत्खनन व अवैध वाहतुकीवर निश्चितच आळा बसण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे.

# नांदेडच्या अविकासाची दुर्गंधी साफ करा : उदय सामंत



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जानेवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडमध्ये आयोजीत सभेमध्ये नांदेड महापालिकेत गेल्या पन्नास वषार्पासून ज्यांची सत्ता होती त्यांनी नांदेडचा विकास केला नाही. त्यामुळे नांदेडमध्ये दुर्गंधी आणि डुकरांचा सुळसुळाट होता, असे वक्तव्य केले होते. ज्यांनी महानगरपालिकेत भ्रष्टाचाराची दुर्गंधी केली अविकासाची दुर्गंधी केली त्यांना सत्तेतून खाली खेचा आणि दुर्गंधी साफ करून विकास करण्यासाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री तथा शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सोमवारी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची कॅनाल रोड येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी आ. वालाजीराव कल्याणकर, शिवालयाच्या अध्यक्षा सौ. संध्याताई कल्याणकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख मंगेश कदम, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर यांच्यासह नदिड उत्तर मधील शिवसेनेचे सर्व उमेदवार यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, नांदेडात केलेली अविकासाची घाण आणि दुर्गंधी काढण्यासाठी शिवसैनिक सज्ज आहेत. तुमच्या मतावर निवडून यायचे महानगरपालिकेच्या शासकीय जागा खाजगी गुत्तेदाराच्या घशात घालायच्या असा प्रकार मागील अनेक वर्शापासुन सुरु आहे. विकासाच्या नावावर पुन्हा सत्ता मिळवायची आणि जनतेला वाऱ्यावर सोडायचे ही भूमिका घेणाऱ्यांना आता सत्तेतून बाहेर हाकलण्याची वेळ आली आहे. राज्याचे मुख्यमंत्रीच जर म्हणत असतील की नांदेडचा विकास गेल्या ७० वर्षात येथील नेतृत्वाने केला नाही तर मग ते नेतृत्व कोणते आहे आणि त्यांनी का विकास केला नाही याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शिवसेनेला सत्तेत पाठवा, असे आवाहन करत आ. बालाजी कल्याणकर यांच्या नेतृत्वात नांदेड उत्तरमधून निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ४० उमेदवारांना विजयी करा असे आवाहनही त्यांनी केले.

## पंचशील विद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**हदगाव** -शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात राजमाता मॉ.साहेब जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे मुख्याध्यापक बंडूवार, पर्यवेक्षक दस्तूरकर, परीक्षा प्रमुख जाधव, संदिप ढोले, दर्शना सोनटक्के, कविता मोगले, सारिका बारसे, रुईकर, पिंपळे, जनार्दन देशमुख, अशोक वाढवे, पुजाराम सुरोशे सह सर्व शिक्षक, मॅडम यांनी पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी इयता पाचव्या वर्गातील मुलींनी सुंदर नृत्य सादर केले.श्रीमती दर्शना सोनटक्के यांनी राजमाता जिजाऊ वंदना सुंदर गायन करून माँ साहेब जिजाऊ यांना अभिवादन केले, तर श्रीमती कविता मोगले यांनी राजमाता जिजाऊंच्या कार्याला उजाळा देत अभिवादन केले.श्रीमती सारिका बारसे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याला सुंदर उजाळा देत स्वामी विवेकानंद यांचे कार्य आणि चरित्र या विषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करत स्वामी विवेकानंद यांना अभिवादन केले.कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनातून जनार्दन देशमुख आणि विजय कांबळे यांनी दोघांच्याही कार्याला उजाळा देऊन अभिवादन केले. माजी आमदार गंगाधर पटणे यांचे निधन झाल्याने कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांना आदर्श विद्यार्जन मंडळातील सर्व संचालक मंडळ, शाळा प्रशासन, शिक्षक व विद्यार्थ्यांन तर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या शोकसभेच्या सुत्रसंचलनातून पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर यांनी माजी आमदार गंगाधर पटणे यांच्या कार्याला उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.



## नापिकी आणि कर्जामुळे जवळगाव येथील अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

**हिमायतनगर** -सतत होणारी नापिकी आणि कर्जबाजारी पणास कंटाळून जवळगाव येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याने विषारी औषध घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव सारख्या सदन भागात गेल्या काही महिन्यांपासून शेतकरी आत्महत्येचे लोण वाढल्यामुळे तीव्र चिंता व्यक्त होत आहे. तालुक्यातील मोदी जवळगाव येथील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव शिवाजी केरबाजी बासरकर वय( ४९ ) असे आहे. रविवारी दुपारी त्यांच्या शेतामध्ये विषारी औषध प्राशन करून आपली जीवन यात्रा संपवली, मयत शिवाजी बासरकर यांची १ एकर शेती असून या अल्पशेतीवरच आपल्या कुटुंबाचा गाडा ओढण्याचे काम ते करीत होते. परंतु गेल्या काही दिवसापासून, शेतमालाला हमीभाव नाही, राष्ट्रीयकृत बँकांच्या वसूलीचा तगादा आदी अनेक सावकारी अडचणींमुळे आर्थिक अडचणी जाणवत होती या सर्व कर्जाची परतफेड कशी करायची या तणावातून त्यांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलले त्यामुळे त्या शेतकऱ्यांस नांदेड येथील शासकीय रुग्णालया पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले होते. यानंतर शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईक यांच्या ताब्यात देण्यात आला. मयत बासरकर यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा मोठा परिवार आहे, दिनांक १२ जानेवारी सोमवार रोजी दुपारी शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. एका तरुण शेतकऱ्याचा परिवार उघड्यावर पडल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



## उमरीत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**उमरी** -स्वराज्याच्या प्रेरिका, जगातील सर्वश्रेष्ठ मातृत्व मॉसाहेब जिजाऊ व विद्वतेचा महासागर युवाशक्तीचे प्रतिक स्वामी विवेकानंद यांची जयंती उमरी शहरातील शिवाय कलेक्शनव मेन्स वेअर मध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नव्यानेच निवड झालेल्या सर्व नगरसेवकांचा सत्कार हि करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या वेळी प्रास्ताविकपर मनोगत राजेश मोरे यांनी व्यक्त केले्. त्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे चारित्र्य थोडक्यात सांगितले, नगरसेवकांचा सत्कार म्हणून बोलत असताना त्यांनी उमरी शहरातील जनतेने आमदार दाम्पत्याची पैश्यांची मस्ती जिरवली अजुन काही शिल्लक असेल तर देगांव पंचायत समिती गणामध्ये यावं असं परखड मत त्यांनी व्यक्त केले तर, कैलासभाऊ गोरठेकर यांनी सत्कार संमारंभाबाबद आभार व्यक्त जयंतीच्या शुभेच्छा दिल्या अध्यक्ष स्थानी रावसाहेब पाटील कुदळेकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, राजेश जाधव, भगवान मुदीराज, आनंदराव यल्लमगोंडे, विष्णूप्रसाद पंडीत उपस्थित होते, यावेळी नगरसेवक संदीप पाटील चंदनवार, अनंत रॅपनवाड, शंकर खांडरे, विक्की रणनवरे, अक्षय पाटील कवळे, अविनाशराव पाटील मोरे, संतोष पाटील कवळे, यशवंत पाटील ढगे, कृष्णा पाटील चांडोळकर, पवन पाटील ढगे ओम पाटील गायकवाड, प्रशांत जाधव कुदळेकर, सोपान पाटील ढगे, आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते व शिवप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राजेश पाटील मोरे यांनी केले तर सुत्रसंचलन किशोर कवडिकवार यांनी केले.




## तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जानेवारी-**

केंद्र शासनाचा ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ व त्याअंतर्गत नियम २०२० संपूर्ण देशात लागू करण्यात आले आहेत. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी केंद्र शासनामार्फत स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

या पोर्टलच्या माध्यमातून तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ उपलब्ध करून देण्यात आला आहे. या हेल्पलाईनद्वारे तृतीयपंथीय व्यक्तींना त्यांच्या हक्कांबाबत माहिती, मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे.

## भाजपाने विकास कामावर पुस्तीका प्रकाशित करणे हस्यास्पद : डॉ. भिंगे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जानेवारी-**

महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने भाजपाच्या वतीने संकल्पनामा प्रकाशित करण्यात आला. यात नांदेड शहरातील काही विकासाच्या कामाचे छायाचित्रे भाजपाच्या कमळासह प्रकाशित करण्यात आली. मात्र नांदेड महानगरपालिका स्थापनेपासून आजलगत भाजपाची नांदेड महानगरपालिकेवर कधीच सत्ता नव्हती तेव्हा त्या विकासकामावर दावा करून पुस्तीका प्रकाशित करणे हस्यास्पद आहे. अशी टीका ओबीसी काँग्रेस विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा महानगरपालिका निवडणूक प्रवक्ते डॉ. यशपाल भिंगे यांनी केली.

यावेळी काँग्रेस जिल्हाप्रवक्ता बापूसाहेब पाटील, आभ्यासक अल्ताफ सानी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. यशपाल भिंगे म्हणाले की, काँग्रेस व वंचित आघाडीला जनतेतून प्रंचड प्रतिसाद मिळत आहे. ६१ हुन अधिक जागा आम्ही जिंकू असे वातावरण आहे. नांदेड मनपावर नेहमीच सेक्युलर विचाराची सत्ता राहिली आहे. ही परंपरा अबाधित राहिल असे वातावरण आहे. पक्षविरोधी भूमिका घेऊन अपक्ष उमेदवार म्हणून निवडून रिंगणात उतरलेले पदाधिकारी मून्तजीब, सुभाष रायबोळे, मनिष कांबळे यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

# शरीर सौंदर्यापेक्षा आत्माचं सौंदर्य श्रेष्ठ : ज्ञानेश्वर महाराज भारती

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १२ जानेवारी-**

आजची तरुण पिढी भौतिक सुखाच्या मागे लागली आहे. परंतु ज्ञानेश्वरी मध्ये सांगितल्याप्रमाणे तैसा हृदयामध्ये मी रामू या ओवीचा विसर समाजाला पडत चालला आहे.मऊ गादी म्हणजे झोपेची गॅरंटी नाही आणि महागडे अन्न म्हणजे पचनाची गॅरंटी नाही. म्हणून आजच्या पिढीला मातापित्यांनी असे संस्कार द्यावेत जे राजमाता जिजाऊंनी बाल शिवबावर केले होते. अशा संस्कारामुळे आत्म्याची सौंदर्यता वाढते. त्यामुळे बाल शिवबा जेव्हा पुढे जाऊन छत्रपती होतात तेव्हा ते कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला आई म्हणून सन्मान देतात.शरीर हे नाशिवंत आहे.पण आत्म्याच सौंदर्य व्यक्तीला अजरामर करून जाते. त्यामुळे शरीर सौंदर्यापेक्षा आत्म्याच सौंदर्य श्रेष्ठ असे प्रतिपादन सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी येथील ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज भारती यांनी केले.बरबडा येथील आदर्श शिक्षक शिवाजी गुरुजी शेवाळे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शुक्रवार, दि.९ रोजी आयोजित भव्य कीर्तन सोहळ्यात प्रचंड जनसमुदायासमोर त्यांनी हा सामाजिक संदेश दिला.




पुढे बोलताना ते म्हणाले, शिक्षकांना विद्यार्थ्यांबद्दल तळमळ हवी. नवीन पिढीच्या शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांबद्दल असलेली तळमळ ही कमी होत चालली आहे.पूर्वी विद्यार्थ्यांच्या मनातही शिक्षकांबद्दल प्रचंड आदर असायचा परंतु आता तो आदर काळानुसार कमी होत चालला आहे.हे देखील तेवढेच सत्य आहे.नैतिक मूल्य शाळेत शिकवली जातात परंतु ' स्व' आचरणातून ती अधिक चांगल्या प्रमाणे रुजवली जाऊ शकतात.संतांची शिकवण, थोर महापुरुषांची शिकवण ही आता पुस्तकांमध्ये बंदिस्त होत चालली आहे.ती आचरणात उतरवणे गरजेचे असून, आदर्श पुरस्कारापेक्षाही शिक्षक स्वतः आदर्श असण ही आता काळजी गरज आहे.शेवाळे गुरुजींच्या आध्यात्मिक जीवनाचे कौतुक करताना महाराजांनी हे विधान करत

नुकतीच राज्याच्या शिक्षण विभागाकडून भटक्या कुत्र्यांचा सर्वे करण्याची जबाबदारी शिक्षकांना देण्यात आली आहे. या मुद्द्याला हात घालत त्यांनी राज्य शासनाला विनंती केली की, शिक्षकांना जास्तीत जास्त वेळ विद्यार्थ्यांना शिकवण्याकरता मिळावा.शिक्षकी पेशा हा विद्यार्थी घडवण्यासाठी आहे भटके कुत्रे मोजण्यासाठी नाही.म्हणून शिक्षण क्षेत्राव्यतिरिक्त अन्य कामाचे ओझे शिक्षकावर लादण्यात येऊ नये असे आवाहन त्यांनी या कीर्तनातून शासनाकडे केले.यानिमित्ताने ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज आलेवार यांच्या वाणीतून ४ ते ८ जानेवारी पर्यंत संगीतमय श्री भागवत कथेच देखील आयोजन करण्यात आले होते.

या कीर्तनामध्ये गायनाचार्य विष्णुदास महाराज तांदळीकर, अमोल महाराज वानखेडे यांच्या पहाडी आवाजाने तसेच नाशिकच्या त्र्यंबक येथील प्रसिद्ध पखवाजवादक विकास दादा बेलुकर यांचे शिष्य आदिनाथ महाराज शिळे, गोविंद जवंजाळ आणि कु.दुर्गा शेवाळे यांच्या सोलो पखवाज वादनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या सोहळ्यासाठी आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी पुनमताई पवार, भाजपचे श्रावण पाटील भिलवंडे, बालाजी बच्चेवार, काँग्रेसचे संभाजी पाटील भिलवंडे, उद्धव सेनेचे रवींद्र पाटील भिलवंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भास्कर दादा भिलवंडे, शिवसेना जिल्हाध्यक्ष गंगाधर बडूरे, भास्करराव धर्माधिकारी, पत्रकार बाळासाहेब पांडे, सदाशिवराव धर्माधिकारी, माजी प्रा.व्यंकट सुरेवाड, रेगुडे गुरुजी, भाजप नायगाव तालुकाध्यक्ष बालाजी मदेवाड, प्राचार्य सुदर्शन धर्माधिकारी, किसान काँग्रेसचे माधवराव धर्माधिकारी, बालाजीराव धर्माधिकारी, प्रकाशराव धर्माधिकारी, बालाजीराव साहेबराव धर्माधिकारी, डॉ.माधव निरगुडे, उपमुख्याध्यापक गणेश बडूरे, बाळू गुरुजी धर्माधिकारी, संतोष पचलिंग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संगीत विभागाचे प्रा.शिवराज शिंदे, प्रा.किरण सावंत तसेच जवाहरलाल नेहरू विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक वृंद यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मंडळी उपस्थित होती.सोहळ्याचे उत्कृष्ट सूत्रसंचालन माजी प्रा.रुद्रवाड पी.जी.यांनी केले..

## बालिका दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**निवघा, दि. १२ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महाताळा येथे क्रांतीज्योती, भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यानिमित्त विद्यार्थ्यांच्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषण स्पर्धा, माझी सावित्री वेशभूषा तसेच समूह गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात होत्या. भोळे मॅडम, खेडकर सर व म्हेत्राजकर मॅडम यांनी सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणा बद्दल केलेल्या चळवळीविषयी, तसेच त्यांच्या शैक्षणिक कार्याची व जीवन प्रवासाची माहिती दिली.

यावेळी सर्व शिक्षक वृंद, अंगणवाडी ताई व मदतनीस, माजी विद्यार्थी, माता पालक तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी सदरील कार्यक्रमास उपस्थित होते. सावरकर सर यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व तसेच सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची माहिती दिली.

# गोकुंदा- किनवट मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक आक्रमक; बेमुदत उपोषणाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १२ जानेवारी-**

गोकुंदा येथील सेंटमेरी स्कूल ते किनवट येथील एन. के. गार्डनपर्यंत असलेल्या मुख्य रस्त्याची गेल्या ७ ते ८ वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, केवळ तात्पुरत्या स्वरूपात चुरी अथवा मुरूम टाकून काम उरकले जात असल्याने समस्या अधिकच गंभीर बनली आहे.

या रस्त्यावरून दर मिनिटाला शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहने ये-जा करतात. त्यामुळे रस्त्यावरून प्रचंड प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना श्वसनाचे विकार, नाकाचे आजार, दीर्घकालीन सर्दी तसेच खड्ड्यांमुळे मणक्यांचे आजार जडत आहेत. विशेष म्हणजे या मार्गावर उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोकुंदा ग्रामपंचायत, उपजिल्हा रुग्णालय, शाळा, महाविद्यालये व खासगी कोचिंग क्लासेस असल्याने या रस्त्याचे महत्त्व अधिक आहे.



नागरिकांनी वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली असतानाही, उड्डाणपूल होणार आहे या कारणावरून रस्त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वाढत्या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले असून, तात्काळ रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

जर १ फेब्रुवारी २०२६ पासून रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर भर रस्त्यावरच बेमुदत प्राणांतिक उपोषण व तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सौ. भावना दीक्षित यांनी प्रशासनाला दिला आहे. आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी नांदेड, सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट, मुख्य कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड, तहसीलदार किनवट व पोलीस निरीक्षक किनवट यांना देण्यात आली आहे.

## नांदेडात महिला सुरक्षेची हमी आहे का? : अदिती तटकरे यांचा सवाल




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ जानेवारी-**

महानगरपालिकेला सीसीटीव्ही कॅमेरे व महिला सुरक्षेची हमी नाही मागील अनेक वर्षापासून अशोक चव्हाण यांच्याकडे सत्ता आहे पण येथील महिला सुरक्षित नाहीत असा दावा महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी केला.

प्रभाग क्रमांक सहा मधील राष्ट्रवादीचे उमेदवार प्रवेशिका क्षितिज जाधव व इंजिनीयर नाज परवीन शेख अब्दुल जब्बार यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार तथा शहराध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या की, क दर्जाच्या नगरपरिषद नगरपालिकांना सुद्धा सर्व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. पण नांदेड महानगरपालिका एवढे मोठे शहर असताना देखील इथे महिला सुरक्षेसाठी कोणती उपाययोजना नाही. लाडक्या बहिणींना आता पिंक रिक्षा सुविधा उपलब्ध करून देणार तसेच लाडक्या बहिणींचा योजना ही कधीही बंद पडू देणार नाही. जोपर्यंत मी आहे लाडक्या बहिणींचा विश्वास अजित दादा सोबत आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींनी ही राष्ट्रवादी काँग्रेसला साथ देण्याचे आवाहन अदिती तटकरे यांनी केले.

यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे तळागाळातील गोरगरिबांच्या मदतीला धावून येणारा पर्याय आहे. सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवार आम्ही दिले आहेत. यांना साथ द्या, आपल्या मताची ताकद द्या. अनेक पक्षांनी धन दांडग्यांना उभे केले आहेत व ते किती आकडा काढायचा हे ठरवत आहेत. पण आमचे उमेदवार सर्व सामान्य आहेत यांच्या नावाने जर आकडा काढायची वेळ येत असेल तर यांना जुगार अड्डे टाकून देऊ का? असा प्रश्न आमदार चिखलीकर यांना उपस्थित केला.